# संगीत उषा नाटक.

संपादक

रा. रा. दामोदर विश्वनाथ नेवाळकर.

प्रकाशक

रा. रा. केशव महादेव आठले.

मुंबईत:

"इंदुप्रकाश" छापखान्यांत छापिलें.

सन १९०५.

किंमत ८ आणे.

हें पुस्तक

श्रीसमर्थ

धूतपापेश्वरस्थ

श्री रघुनाथमहाराज ऊर्फ
काका पुराणिक

यांचे चरणारविंदीं पुस्तककर्त्यांनें नम्रतापूर्वक

अर्पण केलें असे.

# प्रस्तावना.

नाटकाचें संविधानक लौकिक असावें किंवा अलौकिक असावें याविषयीं विद्वानांत मतभेद आहे. दोन्हीं पक्षीं पुढें येणारीं प्रमाणें सारखींच जोरदार आहेत. अशा प्रकारचे सर्वस्वीं बुद्धिबलावर चालणारे विवाद कधींच संपावयाचे नाहींत. अर्थात् दोन्ही प्रकारचीं नाटकें होतच रहाणार. व दोन्ही प्रकार पाहिजेही आहेत. अलौकिक परंतु साधार अशा प्रकारचें नाटक रचावयास लागलें असतां स्वभावरचनेस पुष्कळ मदत होते. ग्रंथकारानें फक्त त्या त्या पात्राच्या स्वभावासंबंधानें ठरींव समजुतीच्या मर्यादेबाहेर पाऊल टाकलें नसलें ह्मणजे पुरे.

नाटक हें वास्तविक दृश्यकाव्य. त्याचा खरा आनंद प्रयोग पाहिला असतां जसा होईल तसा केवळ वाचनानें व्हावयाचा नाहीं. नाटकाचे ग्रंथ वाचतांना व्यक्ति, स्थल इत्यादिकांशीं पूर्ण तादात्म्य झाल्याशिवाय रसप्राप्ति होत नाहीं. परंतु प्रयोगाचे वेळीं प्रत्यक्षदर्शनानें सहृदय प्रेक्षकांस ती सहज होते. प्रयोग पाहण्याची गोष्ट सर्वत्र सुसाध्य नसल्यामुळें, वाचनानें ही मनोरंजन व्हावें, ही गोष्ट लक्ष्यांत ठेवून पुढील अल्पकृति यथामति तयार केली आहे. रचना करण्याचें काम आपलें, बरी वाईट ठरविण्याचें रसिकांचें.

ग्रंथकर्ता.

श्रीमत्सद्गुरुसमर्थ प्रसन्न.

# संगीत 'उषा' नाटक.

## अंक १ ला.

### नांदी.

पद—( चाल—प्यारे नवलि ).

प्रणति निरंत निरंजना ॥ त्या ॥ त्रिगुणात्मक गुणमाया जेथुनि ॥ उद्भवुनी करि ही जगरचना ॥ कर्तृत्वाची वार्ता नसुनी ॥ कारण मायाभासा ह्मणुनी ॥ कर्त्तेपण गुण लाविति भुवनीं ॥ मूढ ज्यास सेवुनि अज्ञाना ॥ १ ॥

पद—( राग हमीर–त्रिवट. )

देउ तुह्मां शिव तो ॥ सदोदित ॥ गाणगभुवनस्थित त्रैमूर्ती ॥ अत्रितनय जो तो ॥ जयाचें श्रीद नित्य जपतां ॥ कळे कीं आत्म-तत्वसत्ता ॥ भवोदधि तरण्या यापरता ॥ उपाय न विवरुनि जगिं बघतां ॥ अनुभव संत महंतांचा हा ॥ सत्य तुह्मां कथितों ॥ १ ॥

सूत्र०—झालें इतकें ईशस्तवन पुरे! असो निमंत्रणाप्रमाणें हे सभाजन तर जमलेच; पण आज यांना मी कोणतें नाटक करून दाखवण्याचें योजिलें होतें बरें? छे कांहीं स्मरत नाहीं. ज्याप्रमाणें कर्णाला त्याच्या धनुर्विद्येनें ऐन वेळेला फसविलें, त्याचप्रमाणें या माझ्या स्मरणशक्तीनें आज मला फसवलें ह्मणायचें! ( इतक्यांत नटी येते. )

नटी—

ठुंबरी.

किती मौजेचें स्वप्न तरी हें पडलें मजला आज ॥ अनुरूप वरासह प्रिय कन्या ॥ रमतां पाहुनि धालें मन्मन ॥ सत्य अनुभवा येइल

जरि हें ॥ लोकीं या कीं धन्यचि होइन ॥ स्वप्न नव्हे हें जगदंबेचें ॥ वरप्रदानचि ऐसें मानिन ॥ १ ॥

**सूत्र०**—प्रिये, हें तुझें स्वप्न खरोखरच शुभसूचक आहे. कारण या जमलेल्या सभाजनांना आज मी जें नाटक करून दाखवणार आहें, त्याची आतां एकाएकीं मला विस्मृति पडली होती; पण हें तुझें स्वप्न कथानक ऐकतांच मला फिरून त्याची आठवण झाली; हाच तुझ्या स्वप्नाचा पहिला शुभशकुन! आजच्या नाटकांतील नायिकेलासुद्धां याचप्रमाणें प्रथमतः स्वप्नांत पति दिसून मग त्या उभयतांच्या विवाहाचा योग मोठ्या गमतीनें जमून आलेला आहे.

**नटी**—एकूण स्वप्नांतल्या गोष्टी अनुभवाला येतात ह्मणायच्या!

**सूत्र०**—अग शुद्धांतःकरणाच्या माणसांना तर वारंवार अनुभवाला येतात; पण काकतालीय न्यायानें इतरांनासुद्धां कधीं कधीं अनुभवाला येतात.

**नटी**—असंच हें माझं स्वप्न जर खरं झालं तर त्या जगदंबेची मी खणानारळानं ओंटी भरीन.

**सूत्र०**—अग श्रद्धेचें फळ परमेश्वर देणारच. तें असो; पण आधीं आतां मी सांगतों असें कर. आजच्या नाटकांतील उपनायिका जी चित्ररेखा तिची भूमिका तूं घे आणि लवकर आपल्या सखीसह या शोणितपुरच्या विलासोपवनांत स्नानाला ये. तोंपर्यंत मी या सभाजनांची प्रार्थना करतों. जा तर.

**नटी**—जशी आपली आज्ञा. ( नटी जाते. )

**सूत्र०**—हे नाट्यकलाभिज्ञ रसिक विद्वज्जन हो—

## साकी.

आधुनिकां नव सुधारकां जरि नवें आवडे सारें ॥ सेवावें तरि जुन पुराण पाहुनि समयविचारें ॥ सार तयामधुनी ॥ घ्यावें दोषदृष्टि त्यजुनी ॥ १ ॥

---

## प्रवेश १ ला.

स्थळ—शोणितपुरांतील एक उपवन.

( उषा, चित्ररेखा, प्रेमळा व पल्लविका. )

पद—( ह्मातारा इतुका न. )

सर्वः—

सुमनोहर उद्यान ॥ बघुनी हरली भूक तहान ॥ शांतिप्रद हें स्थान ॥

चित्र०:—

उंच उंच हे तरुवर पाहें देती छाया छान ॥ मंद मंद हा मारुत वाहे ॥ देत नवें अवसान ॥ प्रतिक्षणिं ॥ देत० ॥

उषाः—

सुमनोलंकारीं या वेली ॥ भूषित तरुणिसमान ॥ मधुपावलि ही जमली ज्या स्थलिं ॥ करावया मधुपान ॥ फुलांतिल ॥ करा० ॥

चित्र०:—

वृक्षस्कंधीं बैसुनि कोकिल ॥ करिती सुस्वर गान ॥ हंसीसह किति हंस करिति हे ॥ जलकेली जलपान ॥ सरोवरिं ॥ जल०॥३॥

चित्ररेखा—तसंच या उपवनाच्या अगदीं मध्यावर हें सरोवैर असल्यामुळं याला कांहीं आणिकच शोभा आली आहे, नाहीं बरं ?

उषा—खरंच गडे, या सरोवराकडे पाहून तनमन कसं अगदीं गार होऊन जातं !

पद—( हा नृपति किति दिसे. )

सुखवि हृदय रमणीय सरोवर ॥ जल तरि बघ किति शांत मनोहर ॥ मंदगती वरि तरंग उठती ॥ तरति सुविकसित कमलें त्यांवर ॥ १ ॥ क्रीडति बघ हे मीन जलांतरिं ॥ चित्रविचित्रचि अनुपम सुंदर ॥ २ ॥

चित्ररेखा—( स्वगत ) आतां थोडासा इथे विनोद करावा ! ( प्रकाश ) पण गडे इकडे ही पाहिलीस का मौज ?

उषा—मौज ? ती काय बाई ?

चित्ररेखाः—

पद्—( कधिं करिती लग्न. )

आलिंगी या तरुसी प्रेमें ही वल्लरी ॥ इजवरी ॥ तयाची परी ॥
प्रीति नच खरी ॥ दिसत वरिवरी ॥ फसति किति नारी ॥
इजसम या भूवरी ॥ १ ॥

उषा—पण या वेलीवर या वृक्षाची प्रीति नाहीं असं कशावरून ताडलंस तूं ?

चित्र०—अग थोडीशी पलीकडे दृष्टि दे ह्मणजे समजेल तुला. तो पाहिलास का त्या पलीकडच्या वेलीला धरण्याकरितां यानं कसा हात पुढें केला आहे तो.

पद—( चाल-सदर. )

टवटवी ॥ तिची ही नवी ॥ यास भूलवी ॥ ह्मणुनि हा नवी ॥ वधू
स्वीकारी ॥ वल्लरि ती सुंदरी ॥ २ ॥

प्रेमळा—एकूण पुरुषांचं मन एकीवर सारखं कधीं टिकून रहांत नाहीं ह्मणतात तें कांहीं खोटं नाहीं.

चित्र०—छे मुळींच नाहीं.

पद—( चाल-सदर. )

पाहुनी ॥ नविन कामिनी ॥ तिजसि भाळुनी ॥ विसरती जुनी ॥
प्रीति बघ सारी ॥ पुरुष गडे यापरी ॥ ३ ॥

प्रेमळा—ह्मणून ह्मणतें गडे, लग्न झाल्यावर तूं बरीक आपल्या पतीविषयीं नीट सावध रहा बरं का ? नाहीं तर एखाद वेळ सांपडायचा तो एखाद्या अप्सरेच्या मोहपाशांत !

उषा—बरं बरं ! मोठी आली आहे मला शिकवायला आजीबाई ! पण काय ग चित्ररेखे, पुरुषांचा बेमानपणा तेवढा चटकन् बाहेर काढलास, पण मी ह्मणतें बायका नसतात का बेमानी ?

**चित्र०**—असतात; नाहीं कोण ह्मणतं ? पण पुरुषांइतपत नसतात हें वरीक खास !

**उषा**—नसतात ? अग पुरुषांपेक्षां कांकणभर जास्त ह्मण, पण कमी नाहींत आणि हें सिद्ध करायला कांहीं फार लांब जायला नको. या पहा—

पद—( धाडुनि दिधलें. )

सूर्यविकासिनि कमलिनि बघ या असति किती बेमानी ॥ निजपति
दिनमणि अस्ता जातां ॥ जार भ्रमर गृहिं कोंडोनी ॥ कमिती
रजनी संगें त्याच्या ॥ अधरामृत त्या पाजोनी ॥ विकसुनि
पुनरपि स्वपतिस दाविति ॥ प्रीती वरिवरि हांसोनी ॥ १ ॥

**पल्लविका**—पण गडे, आज तूं फारसा पुरुषांचा कैवार घेत आहेस ?

**प्रेमळा**—अग आतां पुरुषांचाच कैवार घ्यावयाचे तिचे दिवस आहेत.

**पल्लविका**—ह्मणजे ? मी नाहीं समजलें तूं काय ह्मणतेस तें !

**प्रेमळा**—अग ज्या वस्तूची गरज तिला नांवं ठेवून कसं चालणार ? तिचा कैवारच घ्यायला हवा.

**पल्लविका**—अस्सं ! अस्सं ! ही तुझी खोलांतली कोटी कशी बरं कुणाच्या लक्षांत यावी ? एकूण बरीच कीग आहेस तूं ! पण आमची उषा कांहीं तूं ह्मणतेस तशी पतीकरितां उतावळी झालेली नाहीं.

**प्रेमळा**—नाहीं ? तर मग तूं अगदीं भोळीग भोळी ! माणसाच्या मनोवृत्तीचं चित्र पहायला कांहीं बाजारचा आरसा आणायला नको ! त्याचं तोंड हाच त्याचा आरसा !

**उषा**—बरं बरं ! प्रेमळे, तूं कीं नाहीं अतांशा फार फार लांब जीभ काढून बोलायला शिकली आहेस बरं का ! पण हें कांहीं.

चांगलं नाहीं. चावट कुठली! गडे चित्ररेखे, आतां लवकर एकदांच्या अंगं धुवून घेऊं या. हे पाहिलेस?

पद—( मूढमतें तूं पापराशी. )

मित्रकिरण किति ताप देती ॥ कुसुमाहुनि सकुमार सखीजनवपूसि छळिती ॥ मुखकमलीं टवटवी हुरविति ॥ स्वेदबिंदु सर्वांगिं उमट-वुनि तन मळविती ॥ मस्तकिं शूलहि पहा उठविती ॥ क्षणोक्षणीं त्यायोगें व्याकुळ असंसि करिती ॥ १ ॥

**प्रेमळा**—पल्लविके, मी ह्मणतें तें खरं कीं खोटं हें आतां तूंच पहा ह्मणजे झालं! हिच्या अंगाची तलखी होते, हें हीच स्वतः सांगते आहे, ह्मणून बरं!

**पल्लविका**—पण ती सूर्यकिरणांनीं होते ह्मणून ह्मणते!

**प्रेमळा**—तर मग काय मदनबाणांनीं होते ह्मणून ह्मणेल? मा:-साची लाज, लज्जा, भीड, मुरवत कांहीं नाहींच वाटतं तिला?. अग दाखवायचे दांत निराळे नि खायचे निराळे हें देखील का तुला दुस-ऱ्यानं सांगायला हवं?

**उषा**—मेलं त्या जिभेला हाड आहे कीं नाहीं कुणास ठाऊक!

**पल्ल०**—भारी बाई या प्रेमळेला एखाद्याची नसती कुरापत काढ-ण्याची संवय! नाहीं बरं उषे?

**उषा**—चल, हो दूर, तूंही तसलीच. 'एका माळेचे मणी नि ओंवा-यला नाहीं कुणी.'

**चित्ररेखा**—हद्द असो बाई तुमच्या पुढं! एखाद्याला नाहीं थट्टा सोसत तर मुद्दाम कशाला करायची ती? नाहीं केली तर नाहीं का चालत? गडे, उषे, तूं तरी वेड्यासारखी अशी काय रागावतेस त्यां-च्यावर?

पद—( अंकित पदांबुजाची दासी. )

सखिजनविनोद हा तुज बाई ॥ नच कसा कळत नवलाइ ॥ व्हावें

सुख ज्यापासुनि त्याचा ॥ राग कसा तुज येइ ॥ १ ॥ सुज्ञ असुनि तूं तुजला आह्मी ॥ उपदेशावें काइ ॥ २ ॥

( चतुरिका येते. )

**चतुरिका**—ताईसाहेब, आईसाहेबांनीं हें पूजेचें साहित्य दिलें आहे. नि आंग धुणं झाल्यावर आपण विमानांत बसून देवी पार्वती-मातेचं दर्शन घेऊन यावं असं सांगितलं आहे.

**उषा**—बरं ठेव तें पूजेचें साहित्य त्या शिळेवर नि आज्ञेप्रमाणं करतें, ह्मणून सांग जाऊन आईला. ( चतुरिका जाते. ) चला ग सख्यांनो, लवकर लवकर अंग धुवून घ्या नी चला माझ्याबरोबर आज पार्वतीमातेच्या दर्शनाला. ( प्रेमळा व पल्लविका जातात. ) चित्ररेखे, त्या प्रेमळेवर आणि पल्लविकेवर मी रागावलें खरी पण त्यांचं ह्मणणं खोटं का होतं? आतांशा माझ्या मनोवृत्तींत खराच बदल झालेला आहे! जिवाला कसं तें चैन ह्मणूस नाहीं. सखे—

**पद**—( सुटला पितृदिशेचा )

पतिविण कुठवर धरूं तरी धीर ॥ अवरूं मन किति करुं गंभीर ॥ नच कळे वरिल मज कधीं कवण नरवीर ॥ कुठवरी तरी आवरूं नयनिंचें नीर ॥ पतिविण शून्य गमे मंदीर ॥ स्मरशर झोंबति उरिं खंजीर ॥ चिंताब्धि तरुनि सुखतीर कधीं खंबीर ॥ गांडुनी विलोकिन कांतवदन गंभीर ॥ अंबे दीन सुता हि अधीर ॥ नमवी तव चरणीं निजशीर ॥ करिं पूर्ण मनोरथ इचे न लाविं उशीर ॥ अनुरूप देइं वर हिला सगुण रणधीर ॥ १ ॥

**चित्र०**—गडे, याबद्दल तूं कांहीं काळजी करूं नकोस. तुझी इष्ट-देवता श्रीजगदंबा लवकरच तुझे मनोरथ पूर्ण करील. त्या पहा प्रेमळा, पल्लविका अंग धुऊन आल्या देखील आणि आपण अजून इथेंच आहोंत. चल, अतां जाऊं या अंग धुवायला. ( जातात. )

( प्रेमळा व पल्लविका येतात. )

**प्रेमळा**—पण पाहिलास ना? मघां माझ्या बोलण्याचा उषेला कसा झणकारा आला तो?

**पल्ल०**—कां बरं नाहीं येणार? तूं कीं नाहीं तशीच खट्याळ आहेस?

**प्रेमळा**—आणि तूं काय कमी आहेस?

**पल्ल०**—हं चुप! या पहा त्या आल्याच आंग धुऊन!

( उषा व चित्ररेखा येतात. )

**उषा**—चलाग; येतांना जगदंबेच्या दर्शनाला?

**सर्वः**—

पद—( हे प्रभो विभो. )

जयशुभंकरे ॥ शुभंकरे गिरिकुमरे ॥ प्रणतशिरें ॥ अभयकरें ॥
करिं शांत त्वरें ॥ १ ॥

**प्रेमळा व पल्लविकाः**—

तवकांतकिंकराची ही ॥ आत्मजा उषा तुज वाही ॥ तोपत्रीं
इजसि सुवरें ॥ २ ॥

**प्रवेश १ ला समाप्त.**

---

## प्रवेश २ रा.

**स्थळ**—कैलासपर्वताच्या पायथा.

( बाणासुर व वनचर )

**वनचर**—महाराज, एवढा वेळ विमानांत बसून चाललों होतों तोंपर्यंत कांहीं वाटलें नाहीं, पण आतां हा कैलास पर्वत चढतांना मात्र प्राण कंठांत आला बहुतेक! आतां माझ्यानें एक पाऊलसुद्धां पुढें टाकवत नाहीं!

**बाणासुर**—कां रे! दमलास वाटतें इतक्यांत?

**वनचर**—छे! मी नाहीं दमलों, हे माझे पाय दमले. मोठें अवसान आणून उचलायला पहातों पण बेटे उचलतच नाहींत! ह्मणून ह्मणतों महाराज! पुरे झाला हा कैलास आणि तें भोलानाथांचें दर्शनही! इथेच आमची बहुतेक कैलासवासी होण्याची पाळी येणार असें दिसतें!

**बाणासुर**—वनचरा, अरे असा बायकांप्रमाणें हातपाय काय गाळतोस? आणखी थोडा वेळ कळ सोस.

**वनचर**—पण बळच उरलें नाहीं तर कळ कशी सोसूं महाराज? आपल्याला ब्रह्मदेवानें जसें सहस्रभुजांचें बळ दिलें आहे, तसें मला कुठे दिलें आहे? महाराज, कैलासनाथांजवळ मी एक न्याय मागणार आहें.

**बाणा०**—काय न्याय?

**वनचर**—हो हो न्याय!

**बाणा०**—आणि तो कशासंबंधानें?

**वनचर**—कशासंबंधानें? ब्रह्मदेवाच्या पक्षपातीपणासंबंधानें! अहो त्या ब्रह्मदेवाच्या ठिकाणीं केवढा पक्षपात आहे पहा! आपल्याला जसें त्यानें सहस्रभुजांचें बळ दिलें, तसें मला दिलें असतें तर काय त्याचे हात झिजले असते? आपल्याला त्यानें राजाधिराज केलें तसें मला केलें असतें तर त्यांत त्याच्या पदरचें कांहीं खर्च झालें असतें?

**बाणा०**—वनचरा, किती रे तूं वेडा! अरे ब्रह्मदेव झाला ह्मणून देणार कुठून? देणग्यांचें गांठोडें कां बांधून ठेवलें आहे त्याच्या घरीं? हें पहा—

**पद**—( मज गमे ऐसा. )

फळ पहा मनुजा मिळतसे ॥ कर्म जैसें ॥ पेरावें जें तेंचि उगवतें ॥
सृष्टिनियम हा नेणुनि विधितें ॥ दोष लाविसी कां भलभलते ॥

यथान्याय बग तो वागतसे ॥ १ ॥ घडामोड जो करि विश्वाचि ॥ अल्प समजशी का मति त्याची ॥ सान थोर या अखिल जि- वांचीं ॥ कर्मे सकळही तो जाणतसे ॥ २ ॥

**वनचर**—अस्सं काय ? तर मग आह्मी आपलें न्याय मागणें रहित करितों.

**बाणा०**—हें पहा वनचरा, दुसऱ्याच्या स्थितीचा हेवा केल्यापासून माणसांना पुष्कळ वेळां संकटांत पडावें लागतें. बाबा, जें चकाकतें तें सर्वच सोनें असतें, असें नाहीं; डोंगर दुरून जितका सुशोभित दिसतो तितका तो वास्तविक नसतो; वरवर पहाणाराला सकृद्दर्शनीं एखा- द्याची स्थिति बरी दिसते, पण तिच्यांत परमेश्वरानें कांहींना कांहीं बिंगें ठेविलेलींच असतात. वनचरा, माझी स्थिति तुला कशी वाटते ?

**वनचर**—माझ्यापेक्षां सहस्रपटीनें उत्तम ! आपल्या आणि माझ्या स्थितींत केवढें अंतर आहे पहा ! आपण लक्षाधिपति, तर आह्मी भिक्षाधिपती ! आपण नरवर, तर आह्मी वनचर ! आपल्या डोकीला मुकुट, तर आमच्या डोकीला फाटकें चिरगूट ! आपली बायको महाराणी, तर आमची बायको दीड शहाणी !

**बाणा०**—वा स्थित्यंतर फार चांगलें दाखवलेंस; पण हें बाह्य स्थित्यंतर झालें; माझी अंतःस्थिति तुला कुठे माहीत आहे ? वास्तविक पाहिजे तर,

**पद**—( स्वार्थी जी प्रीति. )

लोकीं या आज मज ऐसा भाग्यवान ॥ एक तरी नृप दिसे तुला का ॥ हरि जो मम अभिमान ॥ अनुपम वैभव पाहुनि माझें ॥ शक्रहि झुरवी मान ॥ असे तसें मज सदाशिवाचें ॥ पूर्ण कृपावर- दान ॥ १ ॥

पण इतक्या सर्व गोष्टी अनुकूल असतांही माझी एकच उत्कट मनेच्छा पूर्ण होत नसल्यामुळें आज मला केवढें तरी निराशेचें दुःख होत आहे:—

पद—( अजवरि नृपति. )

हजार वीर ते असती ॥ संप्रती अमित भूवरती ॥ परि काय वदूं तुज काय वदूं ॥ वीर असा नच त्यांत कुणीही ॥ भुजबल माझें हरुनि धन्य जगिं होई ॥ बल अतुल असुनि मम देहीं ॥ झगडाया मजशीं पाहीं ॥ एकही वीर जगिं नाहीं ॥ वाटते म्हणुनि बहु खंती ॥ चिंतनिं या झोंप नये ती ॥ १ ॥

तर युद्धांत माझ्याशीं दोन हात करून घटकाभर तरी माझ्या सर्व शक्ति हरण करून मला जेरीस आणील असा कुणी तरी वीर मला मिळावा, अशी माझी फार इच्छा आहे.

**वनचर**—तर मग ही आपली इच्छा कांहीं विलक्षणच आहे म्हणायची! संपत्तीचा व्यय होत नाहीं म्हणून चोराची मार्गप्रतीक्षा करायची त्यांतलीच ही आपली इच्छा!

**बाणा०**—छे, छे, असं नाहीं-हें पहा–

## साकी

दानशूर कुणि असुनि तया अनुकूल साधनेंही तीं ॥ परी याचकांवांचुनि त्याची दानशूरता जगतीं ॥ असुनि विफल जशी ॥ स्थिति माझी ही जाण तशी ॥ १ ॥

तर या माझ्या चिंतेचें निरसन व्हावें एवढ्याच हेतूनें मी आज इतक्या उत्कंठेनें कैलासाला चाललों आहें आणि तिथे गेल्यावर पुढें मी काय करणार तें सांगतों ऐक.

पद—( भूपति खरे ते. )

अभिषेकपात्र मुखकमल विमल हें माझें ॥ प्रेमळ स्तवनजल यांत ओतुनी ताजें ॥ अभिषेक करिन शंकरास जिव्हाद्वारें ॥ होईल सहज मग तुष्ट नाथ भोळा रे ॥ मागुनी मनेच्छित वर प्रसंगीं तैसा ॥ साधीन हेतु निज शिवप्रसादें खासा ॥ १ ॥

**प्रवेश २ रा समाप्त.**

## प्रवेश ३ रा.

( स्थळ–कैलास पर्वत—शंकर, पार्वती व शृंगी आणि भृंगी. )

**शंकर—**

पद—( आतां शशिमुखिच्या. )

कांते नयनमना सुखकर किति ऋतु वसंत हा ॥ तरूंस नूतन पल्लव देउनि ॥ सतेज करि जणु संत हा ॥ पुष्पसुगंधें वात सुगंधित ॥ करुनि सुखवि जन, पसंत हा ॥ १ ॥

खरोखर सांगतों पार्वती, आजचा हा प्रातःकाळचा समय तुझ्या संगतींत फारच सुखाचा गेला.

**पार्वती—**हें आपलं तोंडापुरतं कांहीं तरी बोलायचं झालं! नाहीं तर आपल्या सारख्या निरंतर आत्मानंदीं निमग्न राहणाऱ्या योग्यांना दुसऱ्याच्या संगतींत कसं बरं सुख होणार? महाराज, अद्वैताला द्वैताचा संग कधीं तरी खपला आहे का?

**शंकर—**पार्वती, तुझें ह्मणणें कांहीं खोटें नाहीं; पण तूं सांगतेस ही स्थिति माझ्या निर्गुण स्वरूपाची; आणि तें माझें स्वरूप जाणणें फारच कठीण आहे.

पद—( धमार. )

द्वैतसंग प्रथम त्यजुनी ॥ निर्विकल्प स्वमन करुनी ॥ दृष्टि अंतरिं पालटोनी ॥ पाहती मत्स्वरूप मग योगी ॥ एक आत्मा सर्वभूतीं ॥ तेचि माझी स्वयंज्योती ॥ ह्मणुनि सर्वांभूतिं सम ती ॥ धरिति मति मुनि द्वैत सांडोनी ॥ १ ॥

पार्वती, माझ्या निर्गुण स्वरूपाची कल्पना कल्पनेला होणें कधींच शक्य नाहीं. कारण तें माझें स्वरूप मुळचेंच कल्पनातीत आहे तें कुणाला जाणत नाहीं, तें कांहीं पहात नाहीं, आणि ऐकतही नाहीं; देश, काल व स्थिति यांपैकीं एकाचेंही त्याला बंधन नाहीं. तें अखंड अद्वैतानंदमय, एकटें, आपलें आपण असें आहे. पण–कां भृंगी आज

तूं अजून स्वस्थसा ? आज आह्मांला ज्ञानवल्ली नाहीं पाजायची वाटतें तुझ्या मनांतून ?

भृंगी—काका, माझ्या मनांतून पाजायचीही आहे आणि न्याय-चीही आहे, पण काकूंनीं आज पाटा कुठे दडवून टेवला आहे तो सांपडतच नाहीं. आपण तरी द्यायला सांगा.

पार्वती—साफ सांगतें मी कांहीं द्यायची नाहीं; लहानापासून थोरांपर्यंत एकसारखा मेला त्या भांगेचा चाळा! ती नाहीं घेतली तर होतं काय ?

शृंगी—होतं काय! तें काकू तुह्माला सांगून काय उपयोग? तुह्मी घेऊन पहा ह्मणजे समजेल.

पार्वती—इश्श! मला नको ती जळ्ळी! तिच्याकडे पाहूनच माझं डोकं फिरतं!

भृंगी—मग प्याल्यावर तर काय त्रिभुवन फिरायला लागेल बरं कां काकू! पण ह्या कोण? ( उषा, चित्ररेखा, प्रेमळा व पल्लविका येतात. )

पद.

उषा—उभि शिवाजवळि धवलांगी ॥ जगदंबिका वेल्हाळी ॥
प्रेमळा—भूषणें ल्यालि सर्वांगीं ॥ चिरि कुंकुमाची भाळीं ॥
उषा—ही आदिशक्ति सांबाची ॥
प्रेमळा—ही आदिमाय जगताची ॥
उषा—ही कामधेनु भक्तांची ॥
सर्व—मोडुनी खलांची नांगी ॥ भक्तांस ही सांभाळी ॥

पार्वती—कोण उषा नि चित्ररेखा का?

उषा—होय ( सर्व नमस्कार करतात. ) मातोश्री, नित्य नेमा-प्रमाणं आह्मी आपली पूजा करण्याकरितां आलों आहोंत.

पार्वती—बरं घ्या तर आपला नित्य नेम उरकून.

शंकर—भृंगी, आतां या बायकांच्या गोंधळांत उगीच आपण कशाला? क्षणभर त्या पलिकडच्या वृक्षाखालीं जाऊन आपणही आपला नित्य नेम उरकून घेऊं. पण आज अशी छानदार लुढिया बनवशील कीं यंवरे यंव.

उषा-चित्र०—( पूजा आटोपल्यावर )

पद—( नजरिया मिलाये. )

नमूं आदिमाये शिवे सांबजाये ॥ नमूं आदिमाये ॥ शरण आलियां गे ॥ कृपादृष्टि पाहें ॥ शिवशक्ती तूं तव सामर्थ्या ॥ नाहिंच पारावार ॥ अंत कोणा तव न लागे ॥ करीं असुखपरिहार ॥ स्वावलंबे शिवांबे ॥ शुभांगे ॥ विसंबें ॥ न अंबे ॥ १ ॥

पार्व०—मुलींनों, ही जगदंबा तुमचे सर्व मनोरथ पूर्ण करील.

उषा—बरं मातोश्री येतों अतां, आज्ञा असावी.

पार्वती—पण थांबा, ( चित्ररेखेला एकीकडे घेऊन ) कायग, चित्ररेखे आज उषेच्या मुखावर नेहमीं सारखा उल्हास कां बरं नाहीं दिसत?

चित्ररेखा—मातोश्री आपण सर्वांतसाक्षी असून असं विचारतां याचंच आश्चर्य वाटतं.

पार्वती—अस्सं, असं, ( उषेला जवळ घेऊन ) हें बघ उषे, तुझ्या चिंतेचं कारण सारं मला समजलं आहे बरं. आतां मी सांगतें तेवढं ध्यानांत ठेव; या येत्या वैशाख शुद्ध द्वादशीचे रात्रीं जो पुरुष स्वप्नांत येईल तोच तुझा पति होईल बरं का; जा, कांहीं काळजी करूं नकोस. ( सर्व नमस्कार करून जातात. ) अगबाई! दिवस बराच वर आला. रोजची माझी जपाला बसायची वेळ झालीच म्हणायची! जावंच तर मग ( जाते. )

(बाणासुर व वनचर येतात व दुसरीकडून शंकर, शृंगी व भृंगी येतात).

बाणा०—वनचरा, हा पाहिलास?

पद.

येत असे बघ सन्मुख हा शिव शंकर हर भोळा ॥ गंगा शिरिं शशि शोभे भाळीं कंठिं रुंडमाला ॥ व्याघ्रांबर परिवेष्टित अभिनव सुंदर तनुविमला ॥ भुजगभूषणीं अखंड मंडित तृतिय नयनिं ज्वाला ॥ सदा स्मशानीं राहुनि साधी योगसमाधीला ॥ भक्तकामकल्पद्रुम वश हा प्रेमळ भक्तीला ॥ १ ॥

भगवन्, हा आपला चरणसेवक चरणीं लीन होत आहे. याजवर कृपादृष्टि असावी. (पायां पडतो.)

**शंकर**—कल्याण ! कल्याण ! !

**बाणा०**—प्रभो कैलासपते, नित्याप्रमाणें मी आपल्या दर्शनाला आलों आहें. तर आतां मी आपली मानसपूजा करितों ती ग्रहण करावी.

पद—( दशरथ स्त्रीवचनें. )

अलक्ष्य तूं रत निजरंगीं॥लक्ष्यरूप सुस्नेह लावितां शिवा तुझ्या अंगीं॥ भक्तप्रिय तूं शशिमौळी ॥ भक्तिजळीं तुज स्नान घालितों मंगल या काळीं ॥ स्थापुनि चित्तासनिं तुजसी ॥ क्षालन करितों स्वाश्रुजळें तव पादपंकजासी ॥ सहस्रनामें बिल्वदळें ॥ धूप दीप नैवेद्य त्रिपुटिचें ऐक्य गणीं सगळें ॥ करुनी षड्रिपुंच्या वाती ॥ ओंवाळीं ही शेवटिं तुजला प्राणांची आरति ॥ १ ॥

**शंकर**—शाबास ! वत्सा शाबास ! तुझी ही प्रेमळ भक्ति पाहून आज तुझ्यावर मी पूर्ण सुप्रसन्न झालों आहें; तर या वेळीं तुला वाटेल तो वर मागून घे.

**बाणा०**—भगवन्, आपल्या कृपेनें आजपर्यंत माझ्या बहुतेक इच्छा पूर्ण झालेल्या आहेत. आतां अतिशय उत्कट अशी एकच इच्छा आहे.

**शंकर**—ती कोणती ?

**बाणासुर—**

साकी.

भवत्प्रसादें सहस्रभुजबल वसे पहा या देहीं ॥ परी मजसवें रणीं टिकेसा वीर एकही नाहीं ॥ यास्तव या खासा ॥ वीर रणीं मज जिंकि असा ॥ १ ॥

**शंकर**—हर! हर! बाणा काय हा वर मागितलास? अथवा याचा तुझ्याकडे तरी काय दोष? होणारासारखी बुद्धि हेंच खरें. ठीक आहे. ऐक तर मग—

झंपा.

ध्वजस्तंभिंचा शिखि तुझ्या उन्मळोनी ॥ ज्या क्षणिं पडेल भूपृष्ठभागीं ॥ वीर झुंजार कुणि एक तुजसी रणीं ॥ झुंजुनी हरिल तव दर्प वेगीं ॥ जाईं आतां सुखें स्वपुरपथ लक्षुनी ॥ समज तव काळजी सरली अवघी ॥

## ( अंक १ ला समाप्त. )

---

# अंक दुसरा.

## प्रवेश १ ला.

( स्थळ—शोणितपुराबाहेरील एक एकांत स्थान. )

( चतुरिका व तरलिका )

**चतु०**—बघ तर खरी! चार चौघांसमक्ष कशी त्याची फटफजिती करतें ती! असल्या मूर्खांना चांगली ठोकर देऊनच शहाणं केलं पाहिजे. पण हें माझं नाटक पुरं होईपर्यंत तुझ्या तोंडून एक चकार शब्दसुद्धां बाहेर पडतां कामा नये. संकेताप्रमाणं तो आतां इथे येईल; तो इथे आला कीं तूं त्या झाडाच्या आड राहून मुका-

त्यानं काय काय होतं तें पहा आणि मी सांगेन तेव्हां लवकर जाऊन ताईसाहेबांना आमच्या येण्याची इशारत दे. कीं झालं! पण तुझ्या नवऱ्याची अशी धिंड काढल्याबद्दल तुला वाईट तर नाहींना वाटायचं?

**तरलिका**—मला नि वाईट? छे! उलट मी आनंदानें टाळ्या पिटीन! लग्नाच्या बायकोशीं बेमान होऊन परक्या स्त्रीवर डोळा ठेवणारांना अशांच खेटरं मिळालीं पाहिजेत.

**चतु०**—आणि खरं म्हटलं तर यांत वाईट वाटण्यासारखं असं कांहींच नाहीं, ही आपली घटकाभर ताईसाहेबांकरतां करमणूक आहे आणि त्यांतल्या त्यांत त्या मूर्खाला शुद्धीवर आणण्याची एक युक्ति, दुसरं काय? पण ही पहा-चोराप्रमाणं मागं पुढें पहात पहात—होय, तीच स्वारी इकडे येत आहे. जा तर, हो लवकर त्या झाडाच्या आड. ( तरलिका झाडाआड लपते व वनचर येतो. )

**वनचर**—( स्वगत ) ठरल्याप्रमाणें बायकोची नजर चुकवून ही पुतळ्यांची माळ आणि हें लुगडें तर उपटून आणलेंच; पण माझी चतुरिका कुठे दिसत नाहीं ती! ( चहूंकडे पहातो ) या काळोखांत कांहींसुद्धां दिसत नाहीं आतां हांक तरी मारून पहावी. चतुरिके अग चतुरिके—

**चतुरिका**—हां! उगीच ओरडूं नकोस; ही मी इथेंच आहें पण मी सांगितलेल्या वस्तु आणल्यास का आधीं?

**तरलिका**—( स्वगत ) वस्तु? त्या कोणत्या?

**वनचर**—या पहा; ही पुतळ्यांची माळ आणि हें लुगडें अगदीं कोरें करकरीत!

**तरलिका**—( स्वगत ) अरे गुलामा! हें सगळं आणलंस तरी कुठून?

**वनचर**—हें सगळं त्या अवदसेचा डोळा चुकवून मोठ्या हिकमतीनें आणलें बरें का चतुरिके!

**तरलिका**—( स्वगत ) अरे चोरा! पुढं जाऊन तोहूं का मानेचे लवके ? पण नको !

**चतुरिका**—हं, दे पाहूं तें गाठलं पाहूं कसं आहे तें.

**वनचर**—पण हें मी स्वतः तुझ्या गळ्यांत घालणार.

**चतु०**—कांहीं नको मीच घालतें. ( गांठलें घेऊन ) अरे पण मेल्या, माझ्या प्रातीकरितां त्या बिचाऱ्या बायकोचं गांठलं आणलंस आणि आतां तिनं काय करावं ?

**तर०**—बसावं या गुलामाच्या नांवानें रडत !

**वन०**—त्याचें तुला काय ? पण आतां पुढें कसं काय करायचें तें सांग.

**चतुरिका**—सारं सांगतें. पण आधीं हें लुगडं नेस पाहूं.

**वनचर**—कोण ? तूं का मी ?

**चतुरिका**—तूं तूं !

**वनचर**—काय मी आणि लुगडं नेसूं ?

**चतुरिका**—अरे आतां मी तुझी बायको होणार ना ?

**वनचर**—होय.

**चतुरिका**—मग तूं माझ्या आज्ञेंत वागणार ना ?

**वनचर**—होय.

**चतुरिका**—मग आतांपासून वागलास तर पुढं वागशील असं मी समजेन.

**वनचर**—बरें तर नेसतों.

**तरलिका**—( स्वगत ) आतां कसं ? सारं होय ! आणि मी कांहीं सांगितलं कीं माझ्या अंगावर खसदिशीं चवताळून यायचं ! मी फुकटची सांपडलें !

**वनचर**—पण चतुरिके मला लुगडें नेसतां येत नाहीं ग.

**चतुरिका**—थांब मी नेसवतें. ( लुगडें नेसवते. )

**तरलिका**—( स्वगत ) वाहवा रे वाहवा! हेच बरं का ते आमचे चैनी पतिराज! कसे पण नामी शोभताहेत! दिवे ओंवाळा दिवे!

**चतुरिका**—हं, आतां या रुमालानं तुझे डोळे बांधूंदेत मला.

**वनचर**—चतुरिके, आज तूं हें मांडलें आहेस तरी काय?

**चतुरिका**—त्याची तुला पंचाईत? मुकाट्यानं सांगतें तसं ऐक ( डोळे बांधते. )

**तरलिका**—(स्वगत) गुलामा ह्मण आतां. आंधळ्याला दे दाता!

**चतुरिका**—हें बघ, आतां तुला मी माझ्या घरीं नेतें; तिथे माझी आई " तूं कुठली कोण " ह्मणून तुला विचारील तर नीट बायको-सारखा स्वर काढून सांग कीं मी या जवळच्याच खेड्यांतली राहणारी बाई आहें. माझ्या डोळ्यांत फुलं पडलीं आहेत! ह्मणून इथल्या एका वैद्याचं औषध घेण्याकरितां मी या शहरांत आलें आहें. इथे मला दोन महिने रहावं लागेल. गांवांत कुठे माझी ओळख नसल्यामुळं तुमच्या घरीं उतरावं असं मनांतून आहे; माझा खर्च कांहीं तुमच्या अंगावर पडायचा नाहीं.' असं सांगितलंस कीं ती तुला खुशाल रहा ह्मणून सांगेल. आणि असं झालं कीं आपले उभयतांचे हेतु घरच्या घरांत साधल्या सारखे होतील.

**वनचर**—पण तुझ्या घरांत पडून राहिल्यावर महाराजांच्या नोकरीला टाळा बसेल तो?

**चतुरिका**—कसा बसेल? अरे फक्त रात्रींचा तेवढा तूं या वेषानं माझ्या घरीं येणार आणि उजाडलं कीं फिरून आपल्या कामावर!

**वनचर**—आणि दिवसा ही बाई कुठे असते ह्मणून तुझ्या आईनें विचारलं तर?

**चतुरिका**—मी सांगेन तिला कीं वरचेवर वेयाला तिचे डोळे पहायचे असतात ह्मणून दिवसा ती त्याच्याच घरीं असते; त्याची नको तुला काळजी ! ( तरलिकेस पुढें होण्याविषयीं खूण करिते. ) हं, चल तर आतां.

( जातात. )

**प्रवेश पहिला समाप्त.**

---

## प्रवेश २ रा.

**स्थळ**—उषेचें मंदिर.

( उषा, चित्ररेखा, प्रेमळा व पल्लविका. )

**उषा**—पण काय ग चित्ररेखे, ह्मटल्याप्रमाणं ती चतुरिका खरंच करील का ग ?

**चित्ररेखा**—न करायला काय झालं ? आधींच तो वनचर ह्मणजे अक्कलेचा खंदक ! तशांत तिच्या प्रेमपाशांत पुरा सांपडलेला ! मग काय ? ती त्याला हवा तसा नाचवील आणि तो नाचेलही !

**पल्लविका**—तर मग आज हें एक नाटकच पहायला मिळणार ह्मणायचं आपल्याला ! पण त्या मूर्खाला लुगडं नेसवून आणल्यावर त्याच्याशीं बोलायचं कुणी ?

**उषा**—या प्रेमळनं; तें आधींच ठरलं आहे. या नाटकांत ही त्या चतुरिकेची आई बनणार बरं का ? एखाद्या सोंगाची हुबेहुब बतावणी करण्यांत ही प्रेमळा आणि ती चतुरिका दोघी भल्या वस्ताद आहेत. पण चतुरिकेचं भोरीप येईपर्यंत आपण स्वस्थ बसून काय करणार ? एखादं गाणं तरी ह्मणा कुणी.

**चित्ररेखा**—कुणी कशाला ? आपण सर्वांनीं मिळून तें शंकर-पार्वतीच्या संवादाचं गाणं ह्मणूं या.

प्रेमळा—खरंच गडे तें गाणं कीं नाहीं किती किती गोड आहे म्हणून सांगूं!

उषा—बरं तर म्हणूं या तेंच—

सर्वः—

गाणें—( आजी एक्या दिवशीं ऐका नारदऋषी० ).

शंकर—मी स्मशानवासी अलख निरंजन योगी ॥ स्वानंदरत सदा
निर्विकार निस्संगी ॥ ऐशास वरुनि धवलांगी ॥ फसलीस
फुकट तूं खचित खचित दुर्भागी ॥

पार्वती—बोलतां काय हें विपरित बोले अंबा ॥ अंतरंग आपुलें
निर्मल पाहुनि सांबा ॥ घातली माळ या कंठीं ॥ बाह्य-
स्वरूपीं मी नाहीं दिधली दृष्टी ॥

शंकर—तव पतीस ल्याया न मिळे धड लंगोटी ॥ लेशही ज्ञान तें
नसे जयाचे गांठीं ॥ टाकुनी अमृत विष कंठीं ॥ धरि असा
कवण वद मूढ अन्य या सृष्टी ॥

पार्वती—तनु अनित्य आत्मा एक नित्य जाणोनी ॥ बाह्योपचार
त्यागिले विवेकें ज्यांनीं ॥ तेची एक लोकीं ज्ञानी ॥ सेविती
विपद वैराग्य विषयमधु त्यजुनी ॥ १ ॥

( तरलिका येते. )

तरलिका—हं ताईसाहेब झालं काम !

उषा—अग अतां कुणी हंसाल तर खबरदार हां ! अगदीं गप्प बसा.

(चतुरिका व वनचर येतात.)

वनचरः—

पद—( भजेरे मना० )

उडविन रंग अतां उडविन रंग ॥ अनुदिनिं धुंडुनि प्रियसखिसंग ॥
सुंदर रंगित छप्पर पलंग ॥ त्यावरी सखिच्या अंगास अंग ॥
लावुनि होइन रतिसुखांत दंग ॥ १ ॥

**चतु०**—आई अग आई.

**प्रेमळा**—अग पण हो! अगदीं एवढें एकसारखं आई! आई! करायला झालं काय? मोठी ताईसाहेबांची चाकरी बजावून आलीस तें कळलं मला! पण ही बाई कोण आणली आहेस बरोबर?

**चतुरिका**—(वनचरास चिमटा घेऊन) हं बोल.

**वनचर**—आजीबाई, मी कीं नाहीं या जवळच्याच खेड्यांतील राहणारी आहें. माझं नांव रंगाबाई! बरं का?

**पल्लविका**—(स्वगत) वाहवा ग रंगाबाई!

**वनचर**—माझ्या डोळ्यांत फुलें पडलीं आहेत.

**तरलिका**—(स्वगत) परस्त्रीवर डोळा ठेवून होय ना?

**वनचर**—म्हणून औषध घेण्याकरितां मी इथें आलें आहें.

**उषा**—(स्वगत) तर मग चांगलं क्षणक्षणीत अंजन घातलं पाहिजे तुझ्या डोळ्यांत.

**वनचर**—या शहरांत माझी कुणाचीच ओळख नसल्यामुळें मी मोठ्या काळजींत होतें पण तितक्यांत देवानं या तुमच्या मुलीला धाडलीन् माझ्या साह्याला!

**पल्लविका**—(स्वगत) अस्सं! अस्सं!!

**वनचर**—ही तुमची मुलगी किं नाहीं मोठी परोपकरी आहे बरं का, आजीबाई!

**तरलिका**—(स्वगत) परोपकारी आहे कीं अनुपकारी आहे तें आतां लवकरच दिसेल बरं का राजेश्री!

**वनचर**—तुह्मी कांहीं भिऊं नका! माझा खर्च कांहीं तुमच्या अंगावर पडावयाचा नाहीं.

**प्रेमळा**—तर मग खुशाल रहा बरं बाई! तुह्मी आपल्या खर्चानं रहाणार त्यांत आमचं हो काय जातं?

**वनचर**—कसे तरी दोन महिने मला इथे काढिले पाहिजेत खरे! ह्मणतात ना? आलीया भोगासी आणि असावं सादर!

**तरलिका**—( स्वगत ) खरं हो बाई खरं!

**प्रेमळा**—पण कायग आतांसा तो वनचर येतो का कधीं तुझ्याशी चघळपणा करायला पूर्वीसारखा?

**चतुरिका**—येतो तर काय झालं! कोडगाच तो! दोन खेटरं मारलीं तरी तो फुलंच उधळलीं ह्मणून ह्मणायचा!

**प्रेमळा**—ताईसाहेबांच्या देखत एकदां चांगली मेल्याची धिंड काढावी कीं नाहीं?

**वनचर**—( स्वगत ) अतां धिंड काढण्यांत बाकी काय राहिली आहे? ताईसाहेबांच्या देखत काढली नाहीं एवढेंच काय तें!

**उषा**—प्रेमळे, अग पल्लविके, अग चतुरिके!

**वनचर**—अं हा तर ताईसाहेबांचा शब्द! हें लटांबर इकडे कुणीकडे आलें?

**उषा**—अग त्या वनचराला आधीं असेल तसा इकडे घेउन ये पाहूं. त्या मेल्यानं या तरलिकेचं लुगडं आणि पुतळ्याचं गांठलं कुठे नाहींसं करून त्या विचारीला रडत बसवलं आहे!

**वनचर**—(स्वगत) अं? हा आहे तरी काय घोंटाळा?

**उषा**—चतुरिके, अजून तूं इथेच? घेऊन ये ह्मटलं ना त्या चोराला असेल तसा?

**चतुरिका**—असेल तसा?

**वनचर**—( स्वगत ) असेल तसा!

**उषा**—हो हो! असेल तसा!

**चतुरिका**—तर मग हा पहा आहे असा! ( बुरखा काढते. )

**वनचर**—( स्वगत ) हायरे नशिबा ! या बटकीच्या पोरीनें माझी खरीच धिंड काढलीन् !

**उषा**—अरे लबाडा ! असले ढंग करायला शिकला आहेस का आतांशा ?

**वनचर**—ताईसाहेब क्षमा करा ! तुमच्या पायां पडतों ! मी फसणारा नव्हे, पण या सटवीच्या नादानें फसलों !

**तरलिका**—भली खोड मोडली ! दुसरी बायको हवी नाहीं का ?

**वनचर**—उगीच मला आतां खिजवूं नकोस. हा पाहिलास कानाला खडा ! पुन्हा दुसऱ्या बायकोचें ह्मणून नांव काढणार नाहीं. ( तिच्या पायां पडतो. )

**तरलिका**—पण माझं पुतळ्याचं गांठलं आणि लुगडं कुठे आहे तें आणा आधीं.

**वनचर**—हें घे तुझं लुगडं.

**तरलिका**—आणि गांठलं ? (वनचर चतुरिकेकडे बोट दाखवितो.)

**उषा**—चतुरिके, दे तिचं गांठलं तिला आणि घटकाभर तूं आमची करमणूक करून त्यांतल्या त्यांत ह्या गुलामाच्या डोळ्यांत चांगलं अंजन घातलंस ह्मणून हें घे तुला बक्षिस.

**प्रेमळा**—कां वनचर बुवा !

**पल्लवि०**—मोठी गंमत केलीत बुवा !

**वनचर**—आतां पुरे म्हटलंना ! कीं तुमच्याही आणखी पायां पडूं ?

**उषा**—आतां बरीच रात्र झाली नाहीं ?

**प्रेमळा**—होय तर; या गंमतींत थोडा का वेळ गेला ?

**उषा**—चला तर तुह्मी आपआपल्या घरीं; चतुरिके, जा त्यांनां त्यांच्या घरीं पोंचवून ये ( वनचरास ) अरे ती परत येईपर्यंत तिचा पहारा तूं सांभाळ बरं का ? हीच तुला शिक्षा !

पल्लवि०—बरं तर येतों आतां आह्मी !

उषा—हं या. ( पल्लविका, प्रेमळा वगैरे जातात ) चित्ररेखे, अतां निजायचंना ?

चित्र०—होय. पण आजच्या रात्रींचं तुला स्मरण आहेना ? वैशाख शुद्ध द्वादशीची रात्र ही !

पद—( अर्पिलें सुमन. )

यामिनी आज ही सखी तुझी प्रीतीची ॥ करवुनी भेट तुज पतिची ॥
सखि पहा करिल खचितचि ॥ चिंता न आतां करीं तूं कशाची ॥१॥

उषा—पण तूं कुठे निजतेस ?

चित्र०—मी इथेच निजतें या पलिकडच्या गादीवर ?

उषा—बरं तर नीज. ( दोघी झोपीं जातात. )

वनचर—ती सटवी आतां लवकर कशाला परत येते आहे ? तिचा पहारा ताईसाहेबांनीं मला सांभाळायला सांगितला आहे, हें तिला माहीत आहे. मग बसेल तिथेच कुठे तरी गप्पा छाटीत झालें ! आपले तर डोळे पेंगायला लागले ! आतां इथेच कुठे तरी द्यावी ताणून नि काय ? घरच्यापेक्षां इथेच कांहीं बरी झोंप येईल ! आमच्या घरीं काय विचारतां ? सगळाच आनंदी आनंद !

कटाव.

जुनीपुराणी खाट मोडकी ॥ तरटें वरि अंथरलिं फाटकीं ॥ जीर्ण कामळी शत ठिगळांची ॥ मळी जिच्यावर सात पिढ्यांची ॥ मृदुतर असुची शय्या ऐशी ॥ तिजवर बाइल भिल्लिण जैशी ॥ थाट आमुचा काय पुसावा ॥ सेवक असुचे ढेंकुण पिसवा ॥ अंग मर्दिती घेउन चावा ॥ नवरक्ताचा सेवुनि मेवा ॥ गुण गुण ध्वनि चिलटांचा ॥ चाले सुस्वर किति साचा ॥ १ ॥

( जातो. )

उषा—(झोंपेंत) जगदंबेचा वर-वैशाख शुद्ध द्वादशी-आजच ती खरं-मग अजून भेट होत नाहीं ती ? अगबाई ! हा प्रकाश कसला ?

अहाहा ! खास हीच ती मूर्ति ! कां प्रिया असे दूर कां ? आपल्यां दर्शनानं मी धन्य झालें ! काय इतक्यांत जाणार ? छे ! मी नाहीं जाऊं द्यायची ! अगबाई हे चाललेच ! ( एकदम खडबडून जागी होऊन. )

पद—( अरिवध करा. )

जिवलग प्रिया नका जाउं थांबा ॥ न लोपवा मुखशशिप्रभा ॥ ही विनंति परिसा सुवल्लभा ॥ क्षणभर उदास मनास जिवास विलास-सुखानुभवास द्या ॥ १ ॥

चित्ररेखा—सखे, अग सखे, झालं तरी काय ?

उषा—

पद—( वरील पदाचा अंतरा. )

॥ चाल ॥ लोटुनी मज विरह डोहीं प्रियकर गेले हाय गे ॥ अडीव तूं तरि ॥ तयांस झडकरि ॥ हरीं असुख तम जशी प्रभा ॥ १ ॥

चित्र०—अग स्वप्नांत तुझी त्यांची भेट झालीना ? मग जागृतींत तुला ते कसे दिसणार बरं ?

उषा—काय ? तर मग हें सारं स्वप्नच अं ? हाय ! हाय ! सखे अशा आनंदमय स्वप्नांत परमेश्वरानं मला अखंड कां नाहीं ठेवलं ? काय सांगूं सखे ?—

पद—( परिणिलें न मुनि. )

मदनास लाजवी ऐशी ॥ उभि होति मूर्ति मजसरशी ॥ बघ गडे ॥
मज तिनें धरुनि करपाशीं ॥ लाविलें हृदय हृदयाशीं ॥ बघ गडे ॥
त्या क्षणीं ॥ वाटली उणी ॥ स्वर्गसुखखनी ॥ परी ही नाशी ॥
जागृती स्वप्नसुखराशी ॥ बघ गडे ॥ १ ॥

चित्र०—अग पण त्यांनीं आपलं नांव गांव सांगिलेलं कांहीं स्मरतं का तुला ?

उषा—छे बाई ! त्या आनंदाच्या भरांत तेवढं विचारायचं सुचलंच नाहीं !

**चित्र०**—मग अतां त्यांचा शोध कसा करायचा बरं ?

**उषा**—सखे, मला तर कांहींच सुचत नाहीं; आतां तूंच एखादी युक्ति काढ. आणखी—

पद—( दयितांच्या भेटिची. )

त्वरित मला भेटवीं ॥ सखे तो प्राण माझा ॥ क्षणहि त्याविण हा ॥
न राहील प्राण माझा ॥ त्वरित ॥ भेदि हृदय खल पहा मदन हा
वैरी माझा ॥ मुक्त करीं झणिं तापांतुनि या ॥ प्राण माझा ॥ १ ॥

**चित्र०**—( स्वगत ) अतां कसं बरं करावं ? नांव गांव माहीत असल्याशिवाय माणसाचा शोध तरी कसा लावायचा ? पण माझ्याजवळ एवढं जबरदस्त साधन असून मी अशी बुचकळ्यांत काय ह्मणून पडलें आहें ? सखे, अग सखे, सुचली बरं युक्ति !

दिंडी.

न करिं चिंता अणुमात्र भूपजे तूं ॥ प्रयत्नें मी पुरवीन तुझे हेतु ॥
असुखजलधींतुनि पार व्हावया तूं ॥ रचिन आतां युक्तिचा
एक सेतु ॥ १ ॥

जरा थांब; ही मी आलेंच. ( जाते. )

**उषा**—अशी काय बरं हिला युक्ति सुचली असावी ? जगदंबेनंच हिच्या हृदयांत कांहीं प्रेरणा केली असली तर नकळे !

( चित्ररेखा चित्रपट घेऊन येते. )

**चित्र०**:—

पद—( दिलजानी तुने. )

बघ चित्रें हिं सुंदर नयनमनोहर खाशीं ॥ त्रिजगांतील सुंदर नर
रेखिले या नकाशीं ॥ पाहिं पाहिं सखे यांत शोधोनियां ॥ कोठें
दिसे तुला काय चित्रांत या ॥ कांत तव गे ॥ सांग वेगें ॥ १ ॥

गुरुकृपेनें मला त्रैलोक्याचं ज्ञान असल्यामुळं मी स्वतः हे चित्रपट रेखले आहेत. हा पहा ब्रह्मलोक ! हा इंद्रलोक ! हा गंधर्वलोक !

दिसतो आहे का कुठे यांत तुझा प्रियकर? (उषा मानेनें नाहीं ह्मणते.) तरमग हा आपला मृत्युलोक पहा! या देशोदेशींच्या राजपुत्रांच्या प्रतिमा! ही द्वारका नगरी! हा पहा राजा उग्रसेन, हा वसुदेव, हा बलराम, हा त्याचा कनिष्ट बंधु यदुवीर श्रीकृष्ण—

**उषा**—याच वंशांतले असावेत असं वाटतं ग—

**चित्र०**—तर मग हा बघ त्याचा वडील पुत्र प्रद्युम्न—

**उषा**—तोंडवळा जवळ जवळ असाच!

**चित्र०**—तर मग हा पहा त्याचा पुत्र अनिरुद्ध.

**उषा**—( ओळखून. )

पद्—( छब कैसी ये गुयां. )

प्रतिमा ही ॥ अहाहा ग बाई ॥ आनंददायी ॥ प्रतिमा ही ॥ मति-मोही ॥ चतुराई न काई सवाई गमे ही विधीची ॥ तनमन रिझत खचित हें स्मितमुख विलोकुनी ॥ प्रति रतिपतिप्रतिमा ही न वदावी कोणी ॥ १ ॥

**चित्र०**—कां पटली का ओळख? नसेल पटली तर—

**उषा**—नाहीं ग—हीच ती—

पद्—( मी तप्त जरी. )

ही तीच तीच मदनमूर्ति संशय न गडे ॥ जी स्वप्नस्थितिमाजि उभी होति मजपुढें ॥ नच धीर आतां शीघ्र मजसि भेटवीं सखे ॥ करूं काय करिं उपाय झणीं नावरे रडें ॥ १ ॥

**चित्र०**—सखे आतां तूं अगदीं स्वस्थ ऐस. माणसाचा ठाव ठिकाणा लागल्यावर मग भेटीला ग काय उशीर!

पद्—( सज्ज करुनि चाप. )

गांठुनि ती पवनगति द्वारकापुरी ॥ भेटवीन आज तुजसि कांत मंदिरीं ॥ अवघड ती वाट जरी ॥ तुजवरिचें प्रेम तरी ॥ दाविल

मज धरुनि करीं ॥ लोटुनि ती भीति दुरी ॥ करिल सकल हेतु सफल खचित श्रीहरी ॥ १ ॥

ही पहा, चाललेंच मी.

**उषा**—जा तर लवकर—

**पद**—( संग्यांको संदेसा मोरा. )

प्रियाची सखे आधिं जा भेट घे ॥ जा गे ॥ जा गे ॥ जा गे ॥ युक्ति प्रयुक्ती करुनि येथवरि ॥ आर्जवूनी आणीं त्यांसी जीवलगे॥जा गे॥ जा गे ॥ जा गे ॥ १ ॥

**प्रवेश दुसरा समाप्त.**

---

## प्रवेश ३ रा.

**स्थळ**—राजवाड्याचा चौक.

**वनचर**—सगळा वाड्याचा चौक पालथा घातला, पण सटवी कुठे तोंड लपवून बसली आहे कांहीं समजत नाहीं. अग ए चतुरिके, ए बटकीचे पोरी !

**चतुरिका**—( येऊन ) कांरे ? मस्त्या ! एवढा माजलास कशानं ? नीट हाक मारायला तोंड दुखतं वाटतं ? फुकटचं दोन वेळ आदळायला मिळतं, ह्मणून वाटतं ही मस्ती भरली आहे अंगांत ?

**वनचर**—होय ! आदळायला मिळतं ह्मणून माझ्या अंगांत मस्ती भरली आहे आणि तूं जी एवढी रानडुकरासारखी गलेलठ्ठ झाली आहेस, ती आदळायला मिळत नाहीं ह्मणून वाटतं ?

**चतुरिका**—रात्रीं एवढी फटफजिती झाली तरी अजून गुलामाचा वरनक्षा आहेच !

**वनचर**—हा पहा केला आह्मी आपला नक्षा खालीं ! आतां तर झालं ? तुह्माच नक्षा आपला राहूंदे वर ! अगदीं सगळ्या जगासमोर !

हें पहा, तुझ्याशीं बोलायला मला वेळ नाहीं. ताईसाहेबांचा निरोप कळविण्यापुरतेंच माझें तुझ्याशीं काम आहे. आज ताईसाहेबांचें मंदीर शृंगारायचें आहे तर बाकीचीं सगळीं कामें एकीकडे ठेवून आधीं तिकडे जा. त्यांनीं बोलावलें आहे.

**चतुरिका**—बरं असलं कांहीं मेहनतीचं काम असलं कीं ते माझ्याच वांट्याला यायचं, मला माहीत आहे. ( फुणफुणत जाते. )

**वनचर**—काय सटवी चढेल आहे पहा ! एखादं काम आलं कीं केलें तोंड वांकडें आणि कांहीं बक्षीस मिळायचें असलें कीं अगोदर हिचा हात पुढें ! बरें झालें असली घोरपड नाहीं माझ्या गळ्यांत पडली ! नाहीं तर भीक नको पण कुत्रें आवर अशी माझी अवस्था करून टाकली असती इनें. सटवीनें माझी धिंड काढलीन् धिंड.

( जातो. )

**प्रवेश तिसरा समाप्त.**

---

## प्रवेश ४ था.

स्थळ—अरण्य.

( चित्ररेखा प्रवेश करिते. )

**चित्र०**—गुरुवर्य, नारदस्वामीच्या कृपेनं प्राप्त झालेल्या योगसिद्धीच्या बळावर गुप्त रूपानं आकाशमार्गानं गमन करून जवळ जवळ ही द्वारका तर गांठलीच. पण अतां नगरांत प्रवेश होतो कसा ?

पद.

हें चक्र सुदर्शन फिरतें गरगर नगराभंवतें ॥ क्षण एकहि नजर न ठरते क्षणिं दिसतें नच दिसतें ॥ एकवीस हें फेरे फिरतें निमिष न जातां तें ॥ उल्लंघन करण्या यातें करुं कवण उपायातें ॥ १ ॥

झाली ! इथे गतीच खुंटली ! सखीचा मनोरथरूपी गाडा इथेच थबकला ! हे द्वारकाधीशा श्रीकृष्णा, तुझं भक्तवात्सल्य ब्रीद यावरून

मला चळलं असं वाटतं! नाहींपेक्षां हें सुदर्शन माझ्या कार्यांत कधींच आड आलं नसतं. कारण—

पद—( शोभा उपवनिंची. )

पडतां जड भारी ॥ स्मरति सुजन तुज कंसारी ॥ होउं न देसी मग तूं त्यांसी हरि घडिभरही क्षीण ॥ आड सुदर्शन घालुनि फेडिसि निजदासांचें रीण ॥ साच करि तदा श्रीद तुझें हें आयुध परम कठीण ॥ दिसली आज परी ॥ याची उलट कृती सारी ॥ १ ॥

कारण मला साह्य करायचं तर बाजूलाच राहिलं. पण उलट हें सुदर्शन माझ्या कार्यांत मूर्तिमंत विघ्नच होऊन राहिलं आहे! तर मग अशा प्रसंगीं आतां साह्य तरी कुणाचं मागूं ?

[ पडद्यांत— ओंवी.

परम कृपाळु सद्गुरु समर्थ ॥ स्मरणें ज्याचे महा अनर्थ ॥
टळुनी साधती सकल अर्थ ॥ साह्य त्याचेंचि मागावें ॥ १ ॥ ]

चित्र०—अगबाई! या निर्जन अरण्यांत हा उपदेशपर सुस्वर ध्वनी कुणाचा बरं? ( पडद्यांत " अखंड वद हरि हरि मना तूं " ) खास हा नारद स्वामींचाच प्रेमळ ईशभजनघोष! अहाहा! अशा-वेळीं मला साह्य करायला स्वतः गुरुमहाराज आले अं! धन्य सद्गुरु! धन्य सद्गुरु!

पद—( रामकरीं जरि. )

न्याया विघ्नतमा विलयातें ॥ सद्गुरुदिनकर ये उदयातें ॥ वरप्रसादें सखिकार्यातें ॥ साधिन मी आतां ॥ होतां सद्गुरुकृपासुदर्शन ॥ काय करिल हें विघ्न सुदर्शन ॥ यदुकुलनरवरपुरप्रदर्शन ॥ पाहिन निमिषार्धें ॥ १ ॥

आतां इथेच उभं राहून क्षणभर हें प्रेमळ भजन ऐकावं.

( नारद प्रवेश करितो. )

पद—( अखंड हरिहरि वदारे बापांनों. )

अखंड वद हरिहरी ॥ मना तूं ॥ अखंड ॥ साधनें असुनि तव करीं ॥ कां फुकट भवाचे भरीं ॥ पडुनि तूं असुखसागरीं ॥ गुंतुनि मायेचे

दरीं ॥ होसि अपण आपुला अरी ॥ मना तूं ॥ अखंड ॥ नर-देहरूप या रथीं ॥ तूं असुनि चतुर सारथी ॥ इंद्रियें घोडिं तुजासि तीं ॥ करितील खोडि मग किती ॥ धरिं लगाम बळकट करीं ॥ विवेक धरिं ॥ अखंड ॥

त्या कल्पनातीत परमात्म्याची कल्पना या संकल्पविकल्पांनीं व्याप-लेल्या मानवी मनाला काय होणार ? त्या सच्चिदानंद परमात्म्याचा शोध लावणं किती कठीण आहे पहा !

पद—( जेव्हां जेव्हां. )

विकल्प अवघा मारावा ॥ खल संकल्प सुळीं द्यावा ॥ मग पर-मात्मा शोधावा ॥ स्वस्वरुपीं लय लावोनी ॥ काम भयंकर जाळावा ॥ क्रोध समूळचि छेदावा ॥ मग परमात्मा० ॥ लोभ सविस्तर कांडावा ॥ मोह विवेकें दंडावा ॥ मग परमात्मा० ॥ अहंकार पदिं रगडावा ॥ मत्सर खलरिपु तुडवावा ॥ मग परमात्मा० ॥

**चित्र०**—गुरुमहाराज, ही आपली कन्या आपल्या चरणीं लीन होत आहे.

**नारद**—कल्याण ! अग चित्ररेखे, तूं इकडे कुणीकडे ?

**चित्र०**—महाराज, अंतर्ज्ञानानं आपल्याला सर्व कांहीं विदित आहेच. पण आणखी माझ्या तोंडून ऐकण्याची आपली इच्छा दिसते तर सांगतें, ऐकावं—

पद—( श्रीविधिहरिहर. )

बाणकन्यका उषा सुरूपा सखी सुगुणि माझी ॥ प्रसन्न होउनि गौरीनें तिस वर दिधला गुरुजी ॥ होइल पति तव स्वप्निं पुरुष जो पाहशील नेत्रीं ॥ तदनुसार तें घडुनी आलें सर्व काल रात्रीं ॥ विरहें पतिच्या दुःखित सखिला मग मी पाहोनी ॥ आश्वासन तिस दिलें कांत तव भेटवितें आणुनी ॥ १ ॥

**नारद**—मग तूं आतां चाललीस कुणीकडे ?

**चित्र०**—सखीच्या स्वप्नांत जो पुरुष आला त्याची भेट घ्यायला चाललें आहे मी!

**नारद**—तो कोण कुठला!

**चित्र०**—याच द्वारकेंतला श्रीकृष्णाचा नातू आणि प्रद्युम्नाचा मुलगा—

**नारद**—अनिरुद्ध कीं काय? वा! वर तर योग्य आहे! पण या द्वारकेंत तुझा प्रवेश होणार कसा आणि त्याला तूं भेटणार कशी? हें पाहिलेंस सुदर्शन? सारखें फिरतें आहे या द्वारकेच्या सभोंवार! याच्या तडाक्यांतून तूं सुटणार कशी?

**चित्र०**—याच पंचाईतींत मी आहें. महाराज, आतां आपण कांहीं कृपा कराल, तरच हें कार्य माझ्या हातून तडीस जाईल.

**नारद**—चित्ररेखे, तुझ्यासारख्या स्वहितपराङ्मुख व परहित-दक्ष मुलीला जर आमच्या सारख्यांनीं साह्य करायचें नाहीं, तर मग करायचें तरी कुणाला? पण जरा थांब; मला थोडासा विचार करूं दे. (स्वगत) अलीकडे बरेच दिवस आमचा लावालावीचा धंदा अगदीं बंद पडला आहे! तो पुन्हा सुरू करायला हा योग मोठा नामी जुळून आलेला आहे! तर आतां पुढलें धोरण सांभाळण्याकरतां आधींच थोडीशी मेख मारून ठेवावी कि काय? (प्रकाश) पण काय ग चित्ररेखे, समज, द्वारकेंत मी तुझा प्रवेश करून दिला, तर पुढें अनिरुद्धाला तूं भेटणार कशी? अग खुळे! राजवाड्यांत प्रवेश होईपर्यंत मध्यें छप्पन्नशें पहारे आहेत छप्पन्नशें! त्यांतून ग तूं कशी सुटणार?

**चित्र०**—खरंच महाराज! सखीकडून मी निघालें तेव्हां या पुढल्या अडचणी माझ्या मुळींच लक्षांत आल्या नाहींत!

**नारद**—चित्ररेखे, आतां मी सांगतों असें कर; त्या अनिरुद्धाची उघड रीतीनें गांठ घ्याव्याच्या तूं पंचाइतींतच पडूं नकोस! तो रात्रींचा

आपल्या मंदिरांत निद्रिस्थ असतां मंचकासह जो त्याला उचल तो थेट आपल्या सखीच्या मंदिरांत नेऊन उतर ! ( स्वगत ) अनिरुद्ध नाहींसा झाला ह्मणून बसूंदे यादवांना कोंकलत कांहीं दिवस ! ( प्रकाश ) इकडे कान कर तुला मी निरनिराळे असे दोन मंत्र देतों. ( कानांत सांगतो. ) या पहिल्या मंत्राच्या योगानें कुणाला न दिसतां तुझा अनिरुद्धाच्या मंदिरांत प्रवेश होईल आणि या दुसऱ्या मंत्राच्या योगानें त्याच्यावर मोहनास्त्र टाकून त्याला गुप्त रीतीनें मंचकासह उचलून नेतां येईल. अतां या सुदर्शनाबद्दल ह्मणशील तर—

### साकी.

घालुनि माझी शपथ तया वद वाट देईं मज ह्मणुनी ॥ देइल मग तें वाट तुला बघ सहज स्थिरता धरुनी ॥ जाई सुखें आतां ॥ न करीं मानसिं तूं चिंता ॥ १ ॥

**चित्र०**—बरं येतें तर. ( पायां पडून जाते. )

**नारद**—कल्याण.

### पद—( जोगी बनके आया. )

भजनरंगीं ॥ रंगें ॥ सदा संतसंगें ॥ मना विरागें ॥ नच तनुदंडन करणें लागे ॥ जपतपसाधनयोगीं॥हरिनामें अभंगें त्रिताप भंगे॥१॥

### प्रवेश चवथा समाप्त.

---

## प्रवेश ५ वा.

### स्थळ—उषेच्या मंदिराचा बाहेरचा भाग.

**उषा**—पण अजून चित्ररेखा कां बरं येत नाहीं ? रात्र तर बरीच झाली; गेल्यासारखं एकदांचं तिला यश येवो ह्मणजे झालं. माझ्या-करतां त्या बिचारीला विनाकारण त्रास ! आई, जगदंबे, तिच्या श्रमाचं सार्थक करणें आतां तुझ्या हातीं आहे !

पद—( पीलु ).

वेडें मन जाहलें ॥ रतिसुखा भुललें ॥ अनुभव घ्याया सजलें ॥
आतुर होउनि चरण चुराया ॥ स्मितवदनें करिं तांबुल याया ॥
माळ जपाची जणुं धरुनीयां ॥ ध्यान पहा हें करितचि बसलें ॥१॥

अग बाई ! पण हा आवाज कसला ? आली वाटतं ? चित्ररेखाच !

पद—( जगदीश्वर सर्वत्र भरला. )

ममहृत्तापसंतापशमना॥ आलि आलि पहा स्मितवदना ॥ श्रमलीस फार तूं बाई।।मी काय होउं उतराई।।मैत्रिणी सुगुणी॥तुजसम सखी असे कोण सुमना ॥ प्रीति तव खरी ॥ असे मजवरी ॥ नच वरि वरी ॥ दिसत मुळीं ॥ आणुनी प्रियकरा सदना ॥ दिधलेंसि मला असुदाना ॥ उपकृती तुझी ही कशी सांग फेडूं तरी ॥ तव सरी नये कोणा ॥ दिधलेंसि० ॥ १ ॥

**चित्र०**—अग यांत मी अधिक तें काय केलं ? मैत्रिणीला जें उचित तेंच केलं.

**उषा**—पण कायग, चित्ररेखे झोंप लागली आहे वाटतं ?

**चित्र०**—लागली कुठली ! मुद्दाम लाविली आहे ! अग यांच्यावर मोहनास्त्र टाकून मी यांना न कळतां मंचकासह इकडे घेऊन आलें ! हें सारं कसं केलं तें मग सांगेन; पण आधीं आतां यांच्यावरचं मोहनास्त्र काढून कशी काय गंमत होते ती पाहूं या. मग मी जाईन विश्रांति घ्यायला आणि मग ते आणि तूं दोघं जणं घाला वाटेल तसा गोंधळ ! ( मोहनास्त्र काढते. )

**अनिरुद्ध**—( जागा होऊन ) अरे पण हा काय प्रकार ? मी आहें तरी कुठे ? हा मंचक माझा—हा पांघरलेला शेला माझा आणि हा महाल दुसऱ्याचा ? असें कसें होईल ? आज माझ्या दृष्टीला कांहीं तरी भ्रम पडला असावा ! पण भ्रम तरी कसा ह्मणावा ? पूर्वी कधीं न पाहिलेल्या अशा या जागजागीं लाविलेल्या तसबिरी, हा

पंचरंगी पोपट, या रंगी बेरंगी झालरी! सगळाच कांहीं विलक्षण प्रकार!

**उषा**—(स्वगत) एकदम हा सगळा नवीन प्रकार पाहून यांचं मन गोंधळल्यासारखं दिसतं!

**अनिरुद्ध**—काय मी स्वप्नांत तर नाहीं? पण चिमटा घेतला तर अंगाला वेदना होतात! तर मग हा प्रकार आहे तरी काय? (चित्ररेखेला पाहून) आं! आणि ही कोण? हं समजलों! मंत्र सामर्थ्यानें माझें मंदीर भारून मला घोंटाळ्यांत पाडणारी ती हीच! ही कुणी तरी यक्षिणी असावी! (एकदम तिच्या जवळ जाऊन व तिचा हात धरून.)

पद—(जगतांत किमपि.)

तूं कोण कोठील वद शीघ्र मातें॥आलीस कां येथ कोण्या निमित्तें॥
त्वां मंत्रजालें मम मंदिरातें ॥ भारूनि कां भ्रांत केलेंसि मातें ॥
या वीर रणधीर यदुवंशजातें ॥ चेष्टा न देतील तव या भयातें ॥१॥

**चित्र०**—हा बराच न्याय म्हणायचा!

**उषा**—(स्वगत) शिष्याच्या अपराधाबद्दल गुरूला दंड म्हणतात तो असा! पण असा माझा हात धरला असता तर!

**चित्र०**—दुसऱ्याच्या मंदिरांत येऊन उलट तिथल्याच माणसावर ताण झोडायची ही कुठली तऱ्हा! आणि चोर सोडून संन्याशाला धरायचं हा कुठला न्याय?

**अनिरुद्ध**—(उषा दृष्टीस पडतांच) आं! आणि ही कोण दुसरी? हें आहे तरी काय? मायेच्या बाजारांत तर नाहींना मी सांपडलों?

**उषा**—अग चित्ररेखे! काय बाई आश्चर्य तरी! अग माझ्या मं

**चित्र०**—अग दुसऱ्या कुणाचा ? तुझ्या मंदिरांत जे आगांतुक पाहुणे आले आहेत त्यांचा ! आगांतुकीच करायाची मग सहकुटुंब सहपरिवार कां नाहीं केली ? त्यांतलाच हा प्रकार !

**अनिरुद्ध**—( स्वगत ) या स्त्रिया मोठ्या पटाईत दिसतात ! माझ्या मंदिरांत येऊन–माझ्या दृष्टीला भ्रमपाडून उलट मलाच यांनीं आगांतुक बनवलं आं ? ( प्रकाश ) काय ह्मणतां, हें मंदिर तुमचं ?

**चित्र०**—तर मग काय आपऊं ? सखे, ही पाहिलीसना पाहुण्याची आगांतुकी कशी आहे ती ? इतक्यांत तुझ्या मंदिरावर देखील हक्क सांगायला लागले ! कांहीं वेळानं तुझ्यावर न सांगोत ह्मणजें झालं.

**अनिरुद्ध**—( स्वगत ) यांनीं तर माझी थट्टाच मांडली आहे ! ( प्रकाश ) हे स्त्रियांनों, तुम्ही अहांत तरी कोण ?

**चित्र०**—पण महाराज, आपण आलांत तरी कुठून ?

**अनिरुद्ध**—( त्रासून ) तुम्ही आरंभलें आहे तरी काय ? खरें सांगा, हें मंदिर कुणाचं ?

**चित्र०**—अहो महाराज हें आमचं मंदिर.

**अनि०**—काय तुमचं मंदिर ? मग मी इथें कसा आलों ?

**चित्र०**—(स्वगत) आतां फार वेळ यांना संशयांत ठेवणं चांगलं नाहीं. ( प्रकाश ) महाराज, विनाकारण कांहीं आपण भ्रमांत पडूं नये. आपण या वेळीं या माझ्या सखीच्या मंदिरांत अहांत !

**अनिरुद्ध०**——ह्मणजे ?

**चित्र०**—ह्मणजे आपण द्वारकेंत नसून शोणितपुरांत अहांत.

**अनि०**—शोणितपुरांत ? ह्मणजे बाणासुराच्या राजधानींत कीं काय ?

**चित्र०**—होय; ही माझी सखी बाणासुर महाराजांची कन्या.

अनि०—पण मी इथे कसा आलों ?

चित्र०—महाराज हा सारा ईश्वरी नेमानेम ! इकडे कान करा ह्मणजे सारं सांगतें. ( कानांत सांगते ).

अनि०—वाहवा ! एकूण बऱ्याच अह्मांत आपण !

चित्र०—यांत आह्मी काय केलं ? जगदंबेच्या इच्छेनंच सारं झालं आहे !

अनि०—पण मी जागा झालों, तेव्हांच हें सांगितलें असतेंत तर मी एवढ्या घोंटाळ्यांत कशाला पडलों असतों ?

चित्र०—सखे, मी आतां जातें बरं का ? या आपल्या पाहुण्यांचं आतां नीट आगत स्वागत कर !

उषा—पुरे तुझं ! चावट नाहीं तर !

चित्र०—महाराज, ही माझी सखी जशी शरीरानं तशीच मनानंहीं नाजुक आहे, तर हिला नीट सांभाळून घ्यावी बरं का ?

पद—( हीच खरी मूर्ति. )

फुलापरी ॥ झेला करीं॥ ही सुंदरी ॥ सुमंजिरी ॥ अर्पियली ॥ तुझ्यां करीं ॥ मन्मनमोहिनी ॥ हीच पदीं ॥ सुविनती ॥ प्रीती असावी सदा अंतरीं ॥ चंद्र तुह्मी ॥ ही चांदणी ॥ रूपीं गुणीं ॥ न कांहीं उणी ॥ जोडी किती नामि शोभे तरी ॥ १ ॥

उषा—हिचं आपलं कांहींच्या बांहींच !

चित्र०—कांहींच्या बांहींच कसं ?

उषा—नाहीं तर काय ?

पद—( ही मुरली गुंगवी. )

साजे का साजणी ॥ लखलखित कनकमय कोंदणीं ॥ कधीं कांचेचा मणी ॥ मृगमदगंधीं आवड ज्यांची ॥ केविं रमावी मती तयांची ॥ गंधरहित सिकताकणीं ॥ १ ॥

**अनिरुद्ध**—छे छे ! सुंदरी असं कां बरं ह्मणतेस ?

काचमणि न हिरकणी ॥ असिस तूं ॥ काचमणि ॥ जडशिल ज्या कोंदणीं तयाचा होशिल भूषामणी ॥ अनुपम रूपखनी ॥ खचित तूं ॥ दिससि मनोरम अधिकाचि मजसी निजविनयादि गुणीं ॥ कोण तुजसि अवगणी ॥ रसिकजनीं ॥ प्राप्त श्रीतें देइ झुगारुनि सुज्ञ काय वद कुणी ॥ १ ॥

**चित्र०**—सखे मी जातें आतां. माझी कशाला मध्यें अडचण हवी उगीच ? ( जाते. )

**उषा**—अग पण हो ! अग बाई ही गेलीच ! अतां ?

**अनिरुद्ध**—पण मी आहेंना ? (तिचा हात धरतो) सुंदरी, आतां एकांतांत ही लज्जा काय कामाची ? जगदंबेच्याच मनांतून जर तुझा माझा प्रेमसंबंध जमावा असें आहे, तर—

पद—( याचा वदनशशि. )

असेल सखये जरी तुझी संमती ॥ पांचहि तत्वें ठेवुनि साक्षी ॥ वरीन तुज सुमती ॥ अंकित होउनि राहिन अनुदिनिं ॥ तुझ्या वचनिं सुदती ॥ १ ॥

**उषा**—महाराज, हीं गोड गोड भाषणं मला कळतात बरंका ? आपला मतलब साधण्याकरतां अशीं वरपंगीं बोलणीं पुरुषांना बोलावींच लागतात ! पण हें शब्दांतलं प्रेम पुढं शब्दांतच रहातं ! कारण—

पद.

जोंवरी नये ती करीं वस्तु रमणीया ॥ तोंवरी अवड तिचि हृदया ॥ येतां परि करिं एकदां जात विलया ती ॥ तिजवरिल पूर्विंची प्रीती ॥ प्रेम चंचल हें पुरुषांचें ॥ एक जागिं नच टिकायाचें ॥ चार दिवस ध्यान एकीचें ॥ मग "तिजहुनि दुसरी कुणी सरस मिळतां ती ॥ नाचती पहा तिजभंवती ॥ १ ॥

**अनि०**—पण तूं ह्मणतेस तशांतला मी नाहीं.

**उषा**—महाराज, कुठे गेलं तरी पळसाला पानं तीन! तीं कांहीं चार होत नाहीत. तसेच पुरुष इथून तिथून सगळे सारखे!

**अनि०** – कसें कसें? ह्मटलेंस?

**उषा**—ह्मटलं तसंच! पक्षी आपल्या कह्यांत यावा ह्मणून पारधी एका बाजूला धान्याचें आमिष लावून ठेवतात आणि त्या आमिषाला भुलून एकदां तो त्यांच्या जाळ्यांत सांपडला कीं केलाच त्याला जन्माचा बंदीवान्! तसेच पुरुष!

**पद**—( रडसि काय ह्मणुनि. )

प्रथम मधुरवचनसुधाऽऽमिषचि दावुनि॥ प्रेमपाशिं टाकिती अह्मांस जखडुनी॥ पंजरस्थ खगसम मग सदनिं कोंडुनी॥ ठेवितात करुनि जशीं बाहुलीं जनीं॥ १॥

**अनिरुद्ध**—सखे, तुझ्या मनाप्रमाणं सर्व गोष्टी जमून आल्या असून आतां हें ओढून चंद्रबळ कां बरं आणतेस? हें पहा—

**पद**—( राजाची वाटते. )

वाहुनी आण मी तुजसी॥ सांगतों ऐक वचनासी॥ मत्प्रेमसुमन अविनाशी॥ राहील सतत तुजपाशीं॥ जोंवरी प्राण या देहीं॥ तोंवरी विसर तव मजसी॥ न पडेल जाण गुणराशी॥ १॥

मग अतां उशीर कां बरं?

**पद**—( झंपा. )

कडकडुनि जेविं जलदास सौदामिनी॥तेविं मज येउनी भेट जल्दी॥ मदनसंताप किति सहन करुं सुंदरी॥ शांत करिं यास झणिं न करिं अवधी॥ १॥

( आलिंगन देते. )

**उषा**—कां झालं अतां मनासारखं?

**अनि०**—कुणाच्या ? तुझ्या की माझ्या ?

**उषा**—जगदंबेच्या कृपेनं आणि सखीच्या साह्यानं आज हे पाय दृष्टीस पडले !

**अनि०**—तुझा मतलब साधला ! पण मी एकाएकीं नाहींसा झालों हें समजतांच माझ्या घरच्या माणसांची स्थिति काय बरं होईल ?

**उषा**—तें खरंच; पण आपल्याला इथं आणलं नसतं तर माझी स्थिति काय बरं झाली असती ?

**अनिरुद्ध**—तेंही खरंच !

**उषा**—आतां या चरणापाशीं दासीची एक विनंति आहे.

**अनि०**—काय आपली आज्ञा आहे ? ऐकूं तर खरी !

**उषा**—होय आज्ञा ! आणखी काय ?

**अनि०**—बरं विनंति ! कां होईना ! बोला काय ती.

**उषा**—

पद—( तेरा सच नहिं. )

तुझि अनुदिनिं मंदिरिं या ॥ वसुनी सदया॥सुखसंगति या मजसि प्रिया ॥ तुझि ॥ आनंदानें हांसुनि खेळुनि ॥ प्रेमानें गुजगोष्टी बोलुनि ॥ राहूं आपण उभय मिळोनि ॥ विविध सुखद सेवुनि विषयां ॥ १ ॥

( पडदा पडतो. )

## ( अंक २ रा समाप्त. )

---

# अंक तिसरा.

## प्रवेश १ ला.

स्थळ—( बाणासुराची बैठकीची जागा. )

( बाणासुर व बनचर. )

**बाणासुर—**

पद—( पिलु. )

विपरित कां ऐसें ॥ होतें ॥ शून्य अखिल जग कां अजि भासे ॥
दुःख कोणतें मजला नसतां ॥ अवघड हा दिन भारचि माथां ॥
ऐसें वाटे कां या चित्ता ॥ क्षणहि कुठे मन रमत न कैसें ॥ १ ॥

काय असेल तें असो आज माझ्या मनाला स्वस्थताच नाहीं. ( वनचरास ) अरे, बसल्या बसल्या कांहीं कर्मणूक तरी कर.

**वनचर—**पण महाराज, आपल्या मनाला स्वस्थता नाहीं ह्मणताना ?

**बाणा०—**अरे, ह्मणूनच तुला कर्मणूक करायला सांगतों.

**वनचर—**पण आपल्या मनाला जर स्वस्थताच नाहीं तर माझ्या कर्मणुकीकडे आपलें लक्ष लागणार कसें ?

**बाणा०—**लागेल रे ! त्याचें तुला काय ?

**वनचर—**असें नाहीं महाराज ! मी काय ह्मणतों इकडे लक्ष द्या; समजा. एखादी चटकदार गोष्ट सांगून मी आपली कर्मणूक करायला लागलों आणि त्याच वेळीं आपलें मन स्वस्थ नसल्यामुळें वाऱ्याप्रमाणें भलतीकडेच भटकत असलें ह्मणजे मग माझ्या गोष्टीची आणि आपल्या मनाची सांगड कशी बांधायची ती मला सांगा. समजा, मी गोष्ट सांगायला लागलों एखाद्या प्रेमळ मित्राची !

आणि त्याच वेळीं आपल्या मनानें गांठ घेतली एखाद्या बलाढ्य शत्रूची! ह्मणजे गंमत काय होणार ? गोष्ट सांगतां सांगतां मी येणार प्रेमांत ! तर त्याच वेळीं आपण असणार जोमांत ! प्रेमानें माझा कंठ येणार दाटून ! तर वीरश्रीनें आपले डोळे जाणार ताठून ! माझी गोष्ट येणार ऐनरंगांत ! तर त्याच वेळीं आपण असणार लढाईच्या दंग्यांत ! आणि मग कदाचित् असेंही व्हायचें—माझ्या गोष्टींतल्या मित्रानें आपल्या मित्राला असें असें आलिंगन दिलें ह्मणून मी सहज जाणार आपल्याला दाखवायला ! आपण समजणार हा शत्रूच आला भिडायला ! आणि मग त्या आवेशाच्या भरांत जर का एखादी थप्पड दिलीत मला ! तर माझी गोष्ट राहील बाजूला ! आणि फुकट मला मुकावें लागेल जिवाला ! घटकाभर होईल कर्मणूक ! पण अशी ही घोड्याएवढी होईल चूक ! पण—ही पहा आलीच—मूर्तिमंत कर्मणूक !

( नारद येतो. )

**नारद**—

पद—( बिंबाधरा. )

नंदात्मजा ॥ स्मररे ॥मनुजा॥ नमुनी॥ पदांबुजा ॥ जो आपदा ॥ हरितो सदा ॥ भजती सुरवर संतत ज्या ॥ नंदात्मजा ॥ चारी सहा ॥ अठरा पहा ॥ बाहति ह्मणुनी ज्यास 'अजा' ॥ १ ॥

**बाणा०**—यावें महाराज ! ( पायां पडतो. )

**नारद**—कल्याण !

**बाणा०**—महाराज ! आपण अगदीं वेळेवर आलांत. आपल्या सत्समागमानें तरी या दासाच्या मनाला क्षणभर विश्रांति मिळो !

**नारद**—अरे बाणा ! आज तूं असा उद्विग्न कां बरं ?

पद—( शिणलासी माझ्या बारे. )

कां म्लान वदन तव राया ॥ दिसतें अजि मम नयना या ॥ अवघड वाटे काय मनीं तुज ॥ चिंतेचें तव कारण कांहिंच उमजे या ॥

दुःख कशाचें तुजला होतें ॥ कठिण तुला कां वाटे राया मज सांगाया ॥ १ ॥

**बाणा०**—महाराज, माझ्या मनाला काय होत आहे, हें माझें मलाच समजत नाहीं!

**नारद्**—(स्वगत) हे बहुतकरून पुढील दुश्चिन्हाचे डोहळे असावेत!

**बाणा०**—आणि माझ्या उद्विग्नतेचें कारण समजत नाहीं ह्मणून मी जास्त उद्विग्न आहें!

**वनचर**—(स्वगत) तर मग हें मोठेंच आश्चर्य! स्वतःच्या उद्विग्नतेचें कारण न समजण्याइतके राजे लोक मूर्ख असतात अं!

**नारद्**—हें पहा बाणा, हें आमचें मन एखाद्या गर्भिणी स्त्री सारखें आहे. सुखदुःखाचे प्रसंग हे याच्या उदरांतले गर्भ! गर्भाचें लक्षण जसें स्त्रीच्या डोहळ्यांवरून समजतें, तसें पुढील प्रसंगाचें लक्षण या मनाच्या पूर्वचिन्हावरून समजतें. बाणा, यापुढें तुझ्यावर कांहीं तरी दुर्धर प्रसंग येणार असं या तुझ्या मनाच्या स्थितीवरून मला वाटतें!

(सेवक येतो.)

**सेवक**—महाराज, आपल्या ध्वजस्तंभींचा मोर अतां एकाएकीं जमिनीवर कोसळून पडला!

**बाणा०**—हां तरीच! भगवन् आपला अंदाज अगदीं खरा आहे? आतां मलाही पण सावध राहिलें पाहिजे! शंकरमहाराजांचा वर खरा होण्याचा प्रसंग अगदीं जवळ येऊन ठेपला, असें यावरून खास सिद्ध होतें!

**नारद्**—ह्मणजे?

**बाणासुर**—महाराज कांहीं दिवसांपूर्वी मी नेहमींप्रमाणें कैलासनाथांच्या दर्शनाला गेलों असतां, त्यांनीं सुप्रसन्न होऊन मला वाटेल तो वर माग ह्मणून ह्मटलें—

**नारद**—मग तूं कोणता वर मागितलास ?

**बाणा०**—त्यावेळीं मी त्यांना हात जोडून अशी प्रार्थना केली कीं महाराज—

## साकी.

भवत्प्रसादें सहस्रभुजबल वसे पहा या देहीं ॥ परी मजसवें रणीं टिकेसा ॥ वीर एकही नाहीं ॥ यास्तव या खासा ॥ वीर रणीं मज जिंकि असा ॥ १ ॥

यावर त्यांनीं तथास्तु ह्मणून मला असें सांगितलें कीं "तुझ्या ध्वजस्तंभींचा मोर ज्या वेळीं कोसळून जमिनीवर पडेल त्या वेळीं कुणी एक महावीर तुझ्याशीं झुंजायला येऊन तुझा हेतु पूर्ण होईल." तर यावरून तो प्रसंग जवळ आला असावा असें वाटतें. (सेवकास) बरें जा तूं.

**नारद**—(स्वगत) आतां ही संधी फार उत्तम आहे. या वेळीं हळूच आपली फुणगी द्यावी सोडून नि काय! (प्रकाश) बाणा, मघांपासून मी तुझ्याजवळ कांहीं एक गोष्ट सांगावयाच्या विचारांत आहें. पण जाऊं दे, अंधारांतील गोष्ट उजेडांत केव्हांतरी यावयाचीच!

**बाणा०**—महाराज, या आपल्या भाषणाचा भावार्थ माझ्या नाहीं लक्षांत आला!

**नारद**—तसाच तो खोल आहे. तो सहज लक्षांत येण्याजोगा नाहीं!

**नारद०**—ह्मणजे आपण ह्मणतां तरी काय? मुनिवर्य, काय असेल तें स्पष्ट बोला. विनाकारण मला भ्रमांत ठेवूं नका.

**नारद**—अरे, तूं राजा ह्मणवतोस आणि तुझ्या घरांतलें कारस्थान तुला कळूं नये अं! पण जाऊं दे, उंदराच्या पोराला हा लोखंडाचा व्यवहार पाहिजे कशाला? बरें मी येतों आतां!

बाणा०—हं महाराज, असे मला अर्धवट भ्रमांत टाकून जाऊं नका!

पद—( दिलदारी कीनिरे. )

मुनिराया काय हें ॥ करितां ऐसें ॥ सत्य असे तें स्पष्ट वदाया ॥ कष्ट तुह्मां कां वाटति सदया ॥ सांगा मजसि हें ॥ त्रिभुवन साक्षी तुह्मि देवर्षी ॥ गौप्य सकलही विदित तुह्मांसी ॥ न करा ॥ अवधी ॥ सांगा ॥ झडकरि ॥ धरितों पाय हे ॥ १ ॥

नारद—आतां तुझा आग्रहच आहे तर सांगतों; आणि मी नाहीं सांगितलें तरी आज नाहीं उद्यां तुला तें कळणारच. कारण शेजारणीनें कोंबडा झांकला ह्मणून उजडायचें थोडेंच राहातें? मग उगीच चोरून तरी ठेवण्यांत काय अर्थ? सांगतों तुला, ( वनचरास ) अरे, तूं इथून जा पाहूं. (जातो.) हें पहा, बाणा तुला सावध करण्याकरितां ह्मणून आपलें सांगतों, एवढें नीट लक्षांत घे.

झंपा.

रिपू एक तव नांदतो सदनिं तुझिया ॥ तोचि घातक तुला जाण राया ॥ कन्यकेनेंच तव त्यास गृहिं आणुनी ॥ ठेविलें गुप्त निजमंदिरीं त्या ॥ उभयतांमधिल त्या प्रीतिचें संप्रती ॥ फळहि आलें असे जाण उदया ॥ १ ॥

बाणा०—( रागानें ) काय?

नारद—बाणा!

बाणा०—माझी पोर आणि माझ्या शत्रूवर अनुरक्त आं?

नारद—बाणा, एकदम इतका संतापूं नकोस!

बाणा०—संतापूं नकोस! बापाच्या शत्रूला पोरीनें आपल्या मंदिरांत—नव्हे—प्रत्यक्ष आपल्या हृदयांत जागा दिली असतांही संतापूं नकोस आं?

नारद—पण ईश्वरी नेमानेमच तसा असला तर?

**बाणा०**—कसा असला तर ?

**नारद**—पर्यायानं तुझा शत्रूच तुझा जांवई व्हावा असा असला तर ?

**बाणा०**—अहो बेहेत्तर आहे त्या कार्टीला वैधव्य आलें तरी. पण अगोदर जाऊन त्या हरामखोराचा सूड घेतों. ( जाऊं लागतो. )

**नारद**—हं बाणा, " सहसा विद्धीत न क्रियामविवेकः परमापदां पदम् " ह्मणून सांगतों एवढें लक्षांत ठेव; शत्रूला एकदम ठार न करतां तूर्त त्याला कारागृहांतच ठेव !

**बाणा०**—ठीक आहे, जशी आपली आज्ञा ! पण आतां मी आपला निरोप घेतों ! यावेळीं माझ्या सर्वांगांत आग भडकून राहिली आहे !

**नारद**—ठीक आहे, मीही चाललोंच ! (बाणासुर जातो.) माझ्या फुणगीनें काम तर सोळा आणे बजावलें ! आतां पुढची तजवीज ! आतां ही स्वारी त्या अनिरुद्धाला कारागृहांत टाकणारच, तेव्हां आपण द्वारकेकडेच आपला मोर्चा फिरवावा ! हः हः हः तिथे तर काय इथल्यापेक्षांही विलक्षण गंमत उडाली असेल ! पण आतां चित्ररेखेची गांठ कशी पडते ?

( वनचर व चित्ररेखा येतात. )

**वन०**—दुसरें कुणी नाहीं ग एकटे नारदस्वामीच आहेत.

**नारद**—अरे वाः, चित्ररेखा ह्मणतांच चित्ररेखा ! चित्ररेखे, आलीस; बरें झालें !

**चित्र०**—( पायां पडून ) महाराज मी आपल्याच दर्शनाची मार्गप्रतीक्षा करीत होतें.

**नारद**—ती कां बरें ?

**चित्र०**—अरे वनचरा, तूं जा आतां, (जातो.) महाराज, आपल्या कृपेनें मी अनिरुद्ध महाराजांनां इथे आणून सखीचे मनोरथ पूर्ण केले हें आपल्याला माहीत आहेच.

**नारद**—होय, बरं मग ?

**चित्र०**—पण आतां पुढं बरीक मोठा कठीण प्रसंग दिसतो! महाराज, माझ्या सखीला तीन महिन्याच्यावर दिवस–आणि जर का अतां या गोष्टीचा बभ्रा झाला–आणि तो होणारच !

**नारद**—आणि अद्याप झाला नाहीं असें कां तुला वाटतें ? अग ही गुप्त गोष्ट बाणासुराच्या कानांपर्यंत गेलीसुद्धां! या वेळीं तो संतापानें अगदीं लाल झालेला आहे! त्याचा क्रोधावेश कमी व्हावा, ह्मणून मी आपल्याकडून होईल तितकी पराकाष्ठा केली पण व्यर्थ! पालथ्या घड्यावर पाणी!

**चित्र०**—अग बाई! आतां! पण असा हा पाताळयंत्री मनुष्य असावा तरी कोण ?

**नारद**—काय तोटा पडला आहे ? अग मांजर डोळे मिटून दूध प्यालें, ह्मणून जग तर नाहींना आंधळें झालें ?

**चित्र०**—पण असा हा विघ्नसंतोषीपणा करण्यांत माणसाला काय बरं मिळतं ?

**नारद**—मिळायचें काय ? घटकाभर मौज! दुसरें काय ?

**चित्र०**—पण एकायाचा जीव घेण्याची ही कसली मौज ?

**नारद**—बरं, तें राहूं दे, पण आतां पुढें तूं कसें करणार ? तो बाणासुर तर आतांच गेला आहे इथून त्या अनिरुद्धाला पकडायला !

**चित्र०**—महाराज, माझ्या तर सर्वांगांत कांपरं भरलं आहे ही गोष्ट ऐकून. आतां आपणच या संकटांतून बचावण्याची कांहीं युक्ति सांगा. हायरे नशिबा!

पद—( माझा निरोप यशोदेला. )

प्रसंग दुर्धर हा तरि काय ॥ दैवा ओढवला ॥ नकळे होइल काय गती ॥ पतिसह सखिची आतां ती ॥ साहिल कैशी ती सुमती ॥ जनिं अपकीर्तिचा हा घाय ॥ याहुनि मरण बरें परि तें ॥ समयिं अशा न कुणा येतें ॥ सोसावा अपकीर्तीतें ॥ ठेवि जिवंत हा जड काय ॥ १ ॥

नारद—चित्ररेखें, आतां उगीच रडत बसण्यांत काय बरें अर्थ ? अग ! जगदंबेच्या इच्छेनेंच हें सर्व झालें आहेना? मग ग कसली भीति ? माझें ऐकावयाचें असेल तर तूं आतां असें कर. तो बाणासुर एवढा जो खवळला आहे, तो त्या अनिरुद्धाला बंदींत टाकल्यावांचून रहात नाहीं हें खास ! कदाचित् आपल्या मुलीलाही तो तीच वाट दाखवील. आणि या नाटकांतील उपनायिका तूं हेंही त्याला कळून चुकलें आहे; तेव्हां तो त्या दोघांपेक्षां तुझा सूड जास्त घेईल ? याकरतां तूं आपली माझ्याबरोबर चल कशी !

चित्र०—पण महाराज, माझ्या सखीवर आणि तिच्या पतीवर असा प्रसंग आला असतां, अशा वेळीं त्यांना सोडून जाणं मला शोभेल का ?

नारद—पण तिघांनीं गळ्याला गळा लावून मरण्यापेक्षां एकानें सुटें राहून दोघांच्या बचावाचा मार्ग पहाणें विशेष श्रेयस्कर नाहीं का ?

चित्र०—होय, तेंही खरंच.

नारद—तर मग माझ्यावर विश्वास ठेवून चल कशी माझ्याबरोबर. आतां आपण कुठे जायचें तें तुला सांगतों.

पद—( प्रियपत्नी धर्माचरणा. )

अधिं जाउनि द्वारावतिला ॥ कळ लावूं या ॥ बंदिं टाकिलें अनिरुद्धाला ॥ ऐकतांच या वार्तेला ॥ प्रलय करिल बघ ॥ यदुकुळनरवर ॥ १ ॥

प्रवेश १ ला समाप्त.

## प्रवेश २ रा.

**स्थळ**—उषेचें मंदिर.

( उषा व अनिरुद्ध. )

**उषा**—मग अतां पुढं कसं करायचं ?

**अनिरु०**—हें आतां मी तरी काय सांगूं ? जसें करावें तसें भरावें !

**उषा**—तें झालंच ! पण हें असं झाल्यापासून घटकेघटकेला माझ्या पोटांत कसं धस्स होतं ! जगदंबेच्या कृपेनं जें कांहीं झालं तें खऱ्याखऱ्या प्रेमानं आणि पंचतत्वांच्या साक्षीनंच झालं हें खरं ! पण जग कुठे आपल्या इतकं साधं भोळं आहे ? दुसऱ्याचं मर्म सांपडतं केव्हां आणि त्यावर आपण डाग देतों केव्हां असंच बहुतेकांना वाटत असतं !

पद—( कालिंगडा. )

व्रण पाहतांच पशुदेहीं ॥ खल काक जसा मनिं हर्ष पावुनी ॥
नाचु उडूं लागे ॥ तिविं खलातें वर्म कुणाचें ॥ कळतां हरखित
मानस त्याचें ॥ आनंदें मग हांसे नाचे ॥ स्वजनांसही सांगे ॥ १ ॥

**अनि०**—जनानें कांहीं ह्मटलें तरी खरें काय तें आपल्या मनाला माहीत आहेना ? मग कां बरें ?

**उषा**—जनांचं मेलं असो, पण ही गोष्ट जर बाबांनां कळली तर माझं एक राहिलं पण या माझ्या प्राणाचं ( पतीचं ) ते काय करतील हें कांहीं माझ्यानं सांगवत नाहीं आणि हे विचार मनांत आले ह्मणजे काळीज कसं चर्र होतं ! आई अंबाबाई ! आतां आमच्या अब्रूचं रक्षण करणं सर्वस्वी तुझ्या हातीं आहे.

**अनि०**—सखे, माझ्याबद्दलच जर तूं काळजी करीत असशील तर ती करण्याचें कांहीं एक कारण नाहीं. अग माझ्या एका केंसाला धक्का लावण्याची तुझ्या बापाची प्राज्ञा नाहीं. कसा झाला तरी हा वीराचा बचा आहे. अपमान सहन करून स्वस्थ बसणारांपैकीं हा नव्हे. त्यांतू-

नही दुर्दैवानें माझें कांहीं बरें वाईट झालेंच तर त्याबद्दल आमचे याद-ववीर नुसता साधारण सूड उगवूनच स्वस्थ बसतलि असें नाहीं, तर या शोणितपुरांत खरे खरेच शोणिताचे पाट वाहवून मोठा प्रळय करून सोडतील.

( पडद्यांत—धरा, पकडा हरामखोराला, फोडा दरवाजा. )

उषा—अग बाई! हा बाबांचाच शब्द! ज्या प्रसंगाला भीत होतें तो हा शेवटीं आलाच अं! हाय! हाय! प्राणनाथ मी आपली पूर्व जन्मींची दावेदारीण हो दावेदारीण! आपल्याला सर्वस्वी संकटांत लोटण्याला मीच कारण!

पद—( बंजारा. )

मंदिरीं तुह्मां आणोनी ॥ लाविला स्वयें मीं वन्ही ॥ पूर्विचें वैर या जन्मीं ॥ घेतलें पुरें साधुन मीं ॥ खाटीक जसा अज गेहीं ॥ पाळुनी पोसुनी बाई ॥ मग बळी एक दिन देई ॥ शब्बास आपुल्या तैशी ॥ कृति ही न ह्मणावी कैशी ॥ १ ॥

अनि०—सखे, तूं आतां उगीच कां वाईट वाटून घेतेस? प्रसंग आला खरा! मग डगमगून काय उपयोग? काय करूं! या वेळीं मी निःशस्त्र पडलों! पण ही पहा दाराची अर्गळा! हेंच माझें शस्त्र.

पद.

स्वस्थ राहा आतां बघतों कोण येतो कैसा बद्ध कराया सवीरा या॥
मत्त हस्तीयूथीं शिरतां केसरी एकाकी गर्व हराया उशीर न त्या ॥

( बाणासुर सेवकांसह येतो. )

बाणा०—

हाचि तो शठ हाचि, पकडा ॥ नागपाशीं यास जखडा ॥ मुष्टिघातें देह रगडा ॥ मृदुल हा याचा ॥ १ ॥

( सेवक अनिरुद्धाला धरावयास जातात. )

अनि०—हां खबरदार! या वीराशीं दोन हात झाल्याशिवाय हा सहज कधींच तुमच्या हातीं लागायचा नाहीं.

**बाणा०**—चोर तर चोर आणि शिरजोर आँ ?

**उषा**—पण बाबा–

**बाणा०**—काय ह्मणतेस बाळे ?

**उषा**—बाबा नका हो नका–मी आपल्या पायां पडतें.

**बाणा०**—पायां पडतें! अपराध्यांचा अपराध उघडकीला आला कीं, ते पायां पडतात, नाक घांसतात, क्षमा मागतात! काय वाटेल तें करतात!

**उषा**—बाबा, आपल्या दृष्टीनें मी अपराधी आहें खरी, पण मी खरीच तशी आहें कीं काय तें एक त्या जगदंबेला माहीत!

**बाणा०**—जगदंबेला पक्कें माहीत आहे! तूं निर्लज्ज! निर्भीड! प्रति वेसवा आहेस ह्मणून!

**उषा**—बाबा, आपल्या तोंडून आणि असे शब्द अं!

पद.

किति मधुर मधुर तरि शब्द कानिं पडले हे आपुले ॥ जन्मलें
उदरिं आपुल्या सार्थकचि त्याचें जाहलें ॥ जाहलें खरें या कालिं ॥
उभय तीं कुळें उद्धरलीं प्रेमाश्रु पहा किति नयनांतुनि या गळले ॥
सेवीन सुखें मी अतां मरण जरि आलें ॥ १ ॥

**बाणा०**—अरे, तोंड पहात काय राहिलांत? पकडा हरामखोराला!

**अनि०**—हां! जीभ सांभाळून बोला.

**बाणा०**—या वेळीं तूं कोणापुढें उभा आहेस हें तुला माहीत आहे ?

**अनि०**—हो हो! पंचतत्वांच्या साक्षीनें मी जिचें पाणिग्रहण केलें तिच्या बापापुढें मी उभा आहें; आणि हेंही मला माहीत आहे कीं कोणत्याही गोष्टीचा शांतपणानें विचार न करतां एकदम एकाद्या साहसाला प्रवृत्त होणाऱ्या माथेफिरू लोकांपुढेंही उभें रहाण्याचा कधीं कधीं प्रसंग येतो!

बाणा०—असें काय! काय ग ए पोरी! या माणसाच्या नादीं लागून तूं माझ्या पवित्र नांवाला केवढी काळोखी आणलीस याचा कांहीं तुला विचार ?

उषा—( स्वगत ) डोळे मिटून पहाणाराला काळोखावांचून दुसरें काय बरं दिसणार ? ( प्रकाश ) पण जगदंबेला स्मरून सांगतें कीं सद्धर्माला न सोडतां निर्मल अंतःकरणानें माझ्या हातून ही गोष्ट झाली आहे. इतक्या उपर मी आपल्या नांवाला काळोखी आणली असाच आपला समज असेल तर—

पद.

झडकरि यमसदनीं ॥ दवडा मला सुकुंकुमतिलकसुमंडित ॥ दुःख मुक्त मज करिल मरण क्षणीं ॥ असुखद जगतीं ॥ सुख नच जगुनी ॥ जनककरीं जरि मरणहि येतें ॥ सरळचि मग तें ॥ नवल न भुवनीं ॥ १ ॥

बाणासुर—बस्स ! पुरे ! तुझ्या तोंडून एक शब्दसुद्धां ऐकायला नको ! चोराला घरांत बाळगून त्याच्याकडून आपल्या बापाचा घात करूं पहाणारी कृतघ्न पोर एक तुझी तूंच ! बस्स ! पहातां काय ? बांधा चोराच्या मुसक्या !

अनि०—काय ? मुसक्या बांधा ! हा यदुवंशोत्पन्न वीर सहज तुमच्या स्वाधीन होण्या इतका नामर्द नाहीं समजलांत? चला! असेल सामर्थ्य तर होऊन जाऊंद्या दोन हात !

बाणा०—ठीक आहे चल ये. (दोघे लढतात.) या वीराचे अंगीं असामान्य युद्धकौशल्य वसत आहे यांत शंका नाहीं. आतां नागपाशानेंच याला बद्ध केला पाहिजे ! ( तसें करण्याविषयीं सेवकांस सांगतो. ते त्याला पकडतात.) चला घेऊन ! गुलामाला टाका नेऊन बंदींत !

उषा—बाबा कुठे हो घेऊन चाललांत त्यांना ? बाबा नकाहो नका—

पद—( अजुनि येत नाहीं.-भैरवी. )

शरण पदिं सुता ॥ कनवाळु ताता ॥ त्यजुनि अदयता ॥ धरुनि सदयता ॥ पदरिं अतां ॥ घ्या ॥ मत्प्राणाचा प्राणचि नेतां ॥ मग असुरहिता ॥ तनु जशि सरिता ॥ जलविरहिता ॥ १ ॥

अनि०—

व्यर्थ करिसि आर्जवास कासया सुलोचनी ॥ द्रव न खलमनास बाष्पजल न आणिं लोचनीं ॥

उषा०—

जनक हा न खास खल कृतांत भासतो मनीं ॥

अनि०—

ईशचरणिं शरण रिघुनि कंठिं दिवस या जनीं ॥

( अनिरुद्धाला नेतात. )

बाणा०—अरे, आजपासून या कार्टीवर सक्त पहारा ठेवावयाला सांग कारभाऱ्यांना.

( बाणासुर जातो. )

उषा—

पद—( मरण गणुनि दूषवीन. )

अजुनि हा जिवंत काय हाय केविं राहिला ॥ अजुनि तो कृतांत कां स्वगेहिं नेइना हिला ॥ प्रसंग घोर काय हा कळे न आज पात- ला ॥ अजुनि भूमि माय कां न उदरिं ठाव दे मला ॥ १ ॥

प्रवेश दुसरा समाप्त.

## प्रवेश ३ रा.

**स्थळ**—वनचराचें घर.

(वनचर व तरलिका.)

**वनचर**—पाहिल्यास ? श्रीमंतांच्या घरांत कशा मौजा चालतात त्या ? आतां तूंच सांग पाहूं. आपला पूर्वीचा गांवढ्या गांवांतला आयुष्य-क्रम होता तो बरा कीं हल्लीं आहे हा बरा ?

**तरलिका**—एका अर्थानं तो बरा आणि एका अर्थानं हा बरा; गांवीं होतों तेव्हां आपल्याला स्वतंत्रता होती हें खरं; पण तिथे असतांना आपल्या अंगांत कितीक तरी गांवढळपणा होता, तसा आतां कुठे आहे ?

**वनचर**—होय, नाहीं खरा. पण त्याच्या जागीं हल्लीं जो पोकळ नखरा आपल्यांत शिरला आहे तो कुठे होता त्या वेळीं ?

**तरलिका**—इथे आल्यापासून आपल्याला किती तरी नवीन नवीन गोष्टी कळूं लागल्या ! गांवीं असतांना कुठे होता एवढा शहाण-पणा आपल्या अंगांत ?

**वनचर**—होय, हल्लीं जशा आपण दीडशहाण्या बनलां अहांत तशा त्या वेळीं नव्हतां खऱ्या !

**तरलिका**—पुरे झालं ! तुमचं आपलं कांहीं तरीच ! गांवीं असतांना आपल्याला कुणाची सेवाचाकरी करावी लागत नव्हती खरी पण पोटाची खळगीही जेमतेमच भरत होती !

**वन०**—पण कमी अन्नाच्या मानानं आपल्या अंगांत त्यावेळीं मस्तीही कमीच होती. गांवीं असतांनां मी तुला हांक मारली पुरे कीं तूं चटकन् ओ ह्मणून पुढें यायचीस; पण आतां शंख केला तरी तुला दाद नसते. पण जाऊंदे-काय ह्मणत होतों? कालपासून चित्ररेखा कुठे नाहींशी झाली आहे ?

**तर०**—तें मी तरी काय सांगू? पण महाराज ह्मणत होतें कीं कालच्या कृत्यांत मुख्य तिचंच अंग असावं ह्मणून ती कुठे तोंड लप-वून बसली आहे, पण या राजरहस्यांत आपल्यासारख्या गरिबांनीं न पडलेलं बरं नाहीं?

**वन०**—हो मीसुद्धां तेंच ह्मणतों! अग मोठ्यांचें सगळेंच मोठें! मोठ्यांचे हात मोठे! पाय मोठे! पोट मोठें! तोंड मोठें! नाक मोठें! डोळे मोठे! आणि कानही मोठेच! कसे ते सांगतों ऐक—मोठें लोक प्रसंगीं चांगला दानधर्मही करतात आणि वेळ आली तर एखाद्याला चोपही तसाच देतात ह्मणून त्यांचे हात मोठे! प्रसंगीं शरण आलेल्याला अभय देतात आणि वेळेवर एखाद्याची चांगली पाद्यपूजाही करतात. ह्मणून त्यांचे पाय मोठे! शेंकडों गरीब लोक त्यांच्या पोटांत सामावतात आणि तशीच वेळ आली तर स्वतःच्या पोटाकरतां ते शेंकडों गरीब लोकांचीं पोटें उपाशीं मारतात ह्मणून त्यांचें पोट मोठें! तोंडांतून जाडे वजनदार शब्द काढून मोठे लोक गरीब लोकांना मोठ मोठीं अभिवचनें देतात आणि ज्या तोंडानें तीं देतात त्याच तोंडानें तीं मोडायलाही ते तयार असतात, ह्मणून त्यांचें तोंड मोठें!

**तर०**—पण त्यांचें नाक कसं मोठें तें सांगा पाहूं.

**वन०**—मोठ्या लोकांना शिंक आली आणि त्याबरोबर कोणी शतंजीव ह्मटलें कीं त्याला हार नाहीं तर कंठा बक्षीस देतात! आणि तशीच वेळ घेतली तर आपलं नाक कापून दुसऱ्याला अपशकून कर-तात! ह्मणून त्यांचें नाक मोठें!

**तर०**—आणि डोळे कशानं मोठे?

**वन०**—मोठ्या लोकांच्या नुसत्या कृपादृष्टीनें क्षणांत एखादा रंका-चा राव होतो. पण तीच जर का वक्र दृष्टी झाली, कीं झालेंच एखा-द्याचें वाटोळें ह्मणून समजावें! अगदीं सफं सफा!

**तर०**—आणि त्यांचे कान मोठे ते कसे?

**वन०**—हें काय कोणीही सांगेल. मोठे लोक लहरींत असतात, तेव्हां एखाद्या गरीबाचें बोलणें शांतपणानें ऐकून घेतात आणि लहरींत नसतात तेव्हां खसदिशीं गाढवाप्रमाणें अंगावर ओरडतात. म्हणून त्यांचे कान मोठे! पण ही पहा संध्याकाळ झाली आतां कामावर गेलेंच पाहिजे पण आतां जातां जातां एक साखरेचा— (जातात.)

प्रवेश तिसरा समाप्त.

---

## प्रवेश ४ था.

**स्थळ**—द्वारकेंतील एक मंदिर.

(बलराम, कृष्ण, मदन.)

**मदन**—(प्रवेश करून.)

पद—(काहे लागोरी.)

सुतविरह हृदय मम जाळि सतत ॥ अवसान खचत मम धैर्य गळत ॥ नंदन माझा प्राणविसावा ॥ पुनरपि नयनीं पाहिन केव्हां ॥ कोणीं नेला कोठें गेला ॥ झालि काय तरि गति न कळत ॥ १ ॥

**कृष्ण**—बाळा मदना, ये बैस. दादा, अनिरुद्ध नाहींसा झाल्यापासून या चार महिन्यांत याची काय अवस्था झाली पहा तर खरी.

पद—(बहु नीपतरू.)

किति सुतविरहानलिं करपुनि तनु याची सुकलि ही अहा ॥ शक्ति गलित ऊर पक्कपर्णसमचि हा ॥ शुष्क काष्ठसमचि तसे दंडही पहा ॥ तेजरहित नयन वदन शुभ्र वर्ण हा ॥ मज ही ॥ नच बघवे ॥ स्थिति याची ॥ जीव घाबरे हा ॥

**बलराम**—कृष्णा, तुह्मी दोघेही असे उदास राहिलांत तर मी एकट्यानें काय बरें करावें? अनिरुद्ध नाहींसा झाल्यापासून माझ्या जिवाला तरी स्वस्थता आहे का? त्याच्या शोधार्थ मी रोज नवे नवे जासूद

चहूंकडे पाठवितों आहें. हें तूं स्वतः पाहतो आहेस ह्मणून बरें ! बाळा मदना, तूं विचारी आहेस ह्मणून सांगतों, आतां ही काळजी सोडून दे; आणि परमेश्वरावर हवाला ठेवून स्वस्थ रहा.

**कृष्ण**—दादा, नुसत्या उपदेशाच्या गोष्टींनीं कधीं कुणाची का- ळजी सुटली आहे बरं ?

**बल०**—कृष्णा, हेंच तुझें कुजकें बोलणें मला खपत नाहीं तें ! तर मग मी काय करूं तें तरी सांग ?

**कृष्ण**—दादा रागावूं नका ! मला एवढें माहीत आहे. आपण मनावर घ्याल तर वाटेल तें कराल.

पद—( धमार. )

फोडाल पाताळ भेदाल स्वर्लोक ॥ कापाल काळास हलवाल भूलोक ॥ चुरडाल कैलास ब्रह्मांड भूगोल ॥ रगडाल निमिषांत नच बोल हे फोल ।। १ ॥

**बल०**—एकूण माझ्या स्वाधीनची गोष्ट असून मी मुद्दाम अनि- रुद्धाचा शोध करीत नाहीं असें तुझें ह्मणणें ! मला तूं अगदीं पाषाण- हृदयींच समजतोस ! आं ?

**कृष्ण**—असें नाहीं दादा, माझ्या बोलण्याचा भाव-अनिरुद्ध मंचकासह ज्या अर्थी नाहींसा झाला आहे, त्या अर्थी त्याला उचलून नेणारा कुणी तरी यक्षकिन्नरांपैकींच असला पाहिजे आणि हें जर खरें असेल तर आपण आणखी हजारों जासूद पाठवले, तरी त्याचा काय उपयोग होणार ?

**बल०**—हं: ही कल्पना माझ्या डोक्यांत आली नाहीं असें का समजतोस तूं ? अरे, याबद्दल मी मागेंच गुरुमहाराजांना विचारलें; त्या वर त्यांनीं असें सांगितलें कीं यक्षकिन्नरांपैकीं कोणाचेंही हें कृत्य नाहीं. मृत्युलोकच्या माणसांपैकींच कोणाचें तरी हें कृत्य आहे. ( नार- द व चित्ररेखा येतात. )

नारद्—हें पहा, तूं आतां इथेच उभी रहा आणि मी बोलावीन तेव्हां ये. ( पुढें होऊन. ) ' हरि नारायण गुरुनारायण ॥ घडि घडि जिव्हे करिं पारायण ॥

बल०—अरे वा! नारदमुनींची स्वारी आली! यावें नारदमुने!

( सर्व पायां पडतात व बसावयास आसन देतात. )

कृष्ण—कां नारदमुने, आज कोणीकडून येणें झालें आपलें?

नारद्—माझें होय? असें पूर्वेकडून.

कृष्ण—आजकाल कुठे कांहीं अपूर्व असें आपल्या पहाण्यांत किंवा ऐकण्यांत आलें आहे का?

नारद्—अपूर्व? अरे नुसतें अपूर्वच नव्हे तर अश्रुतपूर्व!

कृष्ण—तें काय?

नारद्—तें मग सांगतों. पण आपण सर्व यादव आज असे चिंतातुर कां दिसतां सांगा पाहूं.

बल०—भगवन् काय सांगूं? आज चार महिने झाले आमचा अनिरुद्ध मंचकासह कुठे नाहींसा झाला आहे, त्याचा थांग नाहीं.

नारद्—मंचकासह? अरे ह्मणतोस तरी काय? मंचकासह नाहींसा झाला आं? तर मग त्याला उचलून नेणारा कुणी तरी जबरदस्त वीर असला पाहिजे!

बल०—अहो नुसता जबरदस्त नाहीं. असामान्य जबरदस्त!

कृष्ण०—पण आपण मग सांगतों ह्मणून ह्मणाळांत तें अश्रुतपूर्व काय तें सांगा पाहूं?

नारद्—तें होय, सांगतों. पण तें आपल्यासारख्या प्रतापी यादव वीरांनीं न ऐकलेलें बरें! नाहींतर विनाकारण आपल्याला खालीं मान घालण्याचा प्रसंग यायचा! ह्मणून ह्मणतों आपली झांकली मूठ सवालक्षाची आहे ती फार उत्तम!

बल०—ह्मणजे, त्या गोष्टींत आमचा कांहीं संबंध आहे कीं काय?

नारद—संबंध? अरे अगदीं निकट संबंध!

कृष्ण—हरकत नाहीं असला तरी, पण सांगा.

नारद—सांगूच ह्मणतोस?

कृष्ण—हो हो.

नारद—कृष्णा, अनिरुद्धाला मंचकासह उचलून नेणारा कोण असावा? तुह्मी काय कल्पना आहे?

कृष्ण—याबद्दल माझी कल्पना कांहींच चालत नाहीं. पण दादांच्या ह्मणण्याप्रमाणें तो कुणी तरी महान् सामर्थ्यवान् वीर असावा असें मला वाटतें.

बल०—वाटतें? अहो मी खात्रीनें सांगतों कीं तो कोणी तरी महा बलाढ्यच वीर असला पाहिजे! नाहीं तर या द्वारकेंत पाय ठेवण्याची कुणाची छाती आहे?

नारद—हं बलरामा, पुरे पुरे ह्मटलें! आपलें यादवाचें सामर्थ्य किती आहे, हें निदान मला तरी कळून चुकलें.

मदन—(स्वगत) अनिरुद्धाचा यांना कांहीं तरी सुगावा लागला असावा असें यांच्या बोलण्यावरून वाटतें.

नारद—कृष्णा, तुमचें यादवांचें सामर्थ्य काय तें बायकांजवळच! स्त्रियांचें हरण करण्यांत आपण कुशल अहांत! रुक्मिणीचें हरण करून तूं पुरुषार्थ मिळविलास! रतीचें हरण करून मदनानें पुरुषार्थ मिळविला! पण यःकश्चित् एका स्त्रीनें तुमच्या अनिरुद्धाचें हरण करून जो पुरुषार्थ मिळविला आहे तो जर का ऐकाल तर घटकाभर तुह्मी आश्चर्य चकितच व्हाल.

कृष्ण—काय अनिरुद्धाचें हरण आणि यःकश्चित् स्त्रीनें केलें!

नारद्—अरे मोठ्यानें तरी बोलूं नकोस! एखाद्यानें ऐकिलें तर तुमची फजिती होईल इतकेंच नाहीं तर तुमचा सगळा बोज नाहींसा होईल!

कृष्ण—पण अशी पराक्रमी स्त्री कोण तिचें नांव तर ऐकूं द्या.

नारद्—अरे नांव ऐकूं द्या कशाला? मी तिला प्रत्यक्षच तुमच्या पुढें आणून उभी करतों, पण बलरामाचें तिला पूर्ण अभय असेल तर.

बलराम—माझें पूर्ण अभय आहे. असलें शूरवीर स्त्रीरत्न डोळ्यांनीं पाहूं तर खरं!

नारद्—ठीक आहे तर मग. चित्ररेखे चल ये आतां पुढें!

(चित्ररेखा येते.)

कृष्ण—अहाहा दादा—

पद—(देखो सखि.)

मन हरी सुमुखि ही विनयशील ।। रतिसही स्वरूपें लाजवील ॥
मंदमंद गजगति पद उचली ॥ दिसत इचें मज विमल शील ॥
अल्पवयी ही असुनि सुकोमल ॥ साहस कृति अशि काय करिल॥१॥

नारद्—चित्ररेखे, या हा पहा यादवांचा अधिपति बलराम—हा यदुवीर श्रीकृष्ण आणि हा तुझ्या सखीचा सासरा मदन या सर्वांना नमस्कार करून आपल्या अपराधाची क्षमा माग.

कृष्ण—(चित्ररेखा नमस्कार करणार तोंच) पण थांब! काय ग ए धाडशी मुली! आमच्या अनिरुद्धाचें हरण करणारी ती तूंच का?

चित्र०—होय महाराज, पण मी नाहीं ती दुसरीच आहे.

बलराम—ह्मणजे याचा अर्थ काय?

चित्र०—ह्मणजे त्यांचें हरण करणारी मी खरी पण त्यांचें मन हरण करणारी ती दुसरीच आहे.

**बल०**—ती कोण ?

**चित्र०**—माझी प्रियसखी, बाणासुर महाराजांची कन्या.

**कृष्ण**—एकूण तुह्मी बऱ्याच उपद्व्यापी मुली अहांत ह्मणावयाच्या!

**नारद**—पण यांत तुझें वाईट काय झालें ? तुला आपली आयती नातसून मिळाली ! पण जांवईबुवांची स्वारी तूर्त सासऱ्याच्या कारागृहांत आहे, एवढेंच जरा—

**बलराम**—ह्मणजे ?

**चित्र०**—महाराज मी आपली सर्वस्वी अपराधी आहें; आधीं मला क्षमा करा मग मी सारं सांगतें.

## पद.

शरण पदीं येत ही ॥ दीन दासी अपराधी ॥ तुह्मी कृपावंत सुधी ॥
करा क्षमा हीस आधीं ॥ केली बहुत उपाधी॥परि पदरीं घ्या तुह्मी॥१॥

**बल०**—तुला पूर्ण क्षमा आहे. पण सर्व खरा खरा प्रकार मात्र सांग.

**चित्र०**—तर मग ऐका. कांहीं दिवसांपूर्वी पार्वती मातेनं माझ्या सखीला असा वर दिला होता कीं वैशाख शुद्ध द्वादशीचे रात्रीं तिच्या स्वप्नांत जो पुरुष येईल तोच तिचा पति होईल. त्याप्रमाणं त्या रात्रीं तिच्या स्वप्नांत अनिरुद्ध महाराजांची स्वारी आली ! पुढें ती जागी झाल्यावर स्वप्नांत पाहिलेल्या मूर्तीचा विरह तिला सहन होईनासा झाला. ती तिची अवस्था माझ्यानं पहावेना ह्मणून मी या साहसाला प्रवृत्त झालें !

**बल०**—पण स्वप्नांतला पुरुष अनिरुद्धच ह्मणून तुला समजलं कसं ? अनिरुद्धाच्या मंदिरांत तुझा प्रवेश झाला कसा ? आणि कुणाला न कळतां मंचकासह तूं त्याला कोणत्या युक्तीनें घेऊन गेलीस कशी ?

**चित्र०**—महाराज हें सारं गुरुकृपेचें सामर्थ्य !

**कृष्ण**—पण नारदमुने, जांवईबुवांची स्वारी कारागृहांत आहे ह्मणून आतां आपण ह्मणालांत तें काय ?

**नारद**—तें तिलाच विचारा !

**चित्र०**—महाराज, अनिरुद्ध महाराजांना भेटवून मी सखीचें मन आनंदित केलं, पण आतां बरीक मोठा कठीण प्रसंग येऊन ठेपला आहे. या गुप्त विवाहाची वार्ता नुकतीच कुणी बाणासुर महाराजांना कळवली ! आह्मी इकडे येण्यापूर्वीच ते अनिरुद्ध महाराजांना पकड-ण्याकरितां सखीच्या मंदिराकडे गेले होते. आतां पुढं घडगत नाहीं असं पाहून गुरुमहाराजांच्या विचारानं मी ही गोष्ट आपल्याला कळवण्याकरतां यांच्याबरोबर इकडे आलें !

**नारद**—हिनें सांगितलेली हकीकत अगदीं अक्षरशः खरी आहे. या वेळीं अनिरुद्ध निःसंशय बंदींत असला पाहिजे !

**बल०**—काय ? अनिरुद्ध बंदींत ?

**नारद**—मग तुला आश्चर्य काय वाटलें ? तो नांवाचा बाणासुर आहे बाणासुर !

**बल०**—बाणासुर असो कीं काणासुर असो ! आतां या बलरा-माशीं गांठ आहे एवढं लक्षांत ठेवा !

### श्लोक.

शत्रूच्या रक्तपानास्तव तृषित सदा मत्करींची गदा ही ॥ साह्यें
जीच्या अनेकां समयिं किति खलां दंडिलें दुर्मदांही ॥ घालोनी
तीच आतां खल असुरशिरीं प्राण घेतों तयाचा ॥ मक्रोधाग्नीमध्यें
या शलभसमचि तो दग्ध होईल साचा ॥ १ ॥

हं कृष्णा, आतां क्षणाचाही विलंब नको; आधीं शोणितपुर गांठूं या.

**कृष्ण**—होय तर, मला आलेंच पाहिजे. माझ्याशिवाय तिथे काय होणार ! ( नारदास ) बरं, आह्मी आपली आज्ञा घेतों.

**नारद**—ठीक आहे, आम्हीही येतोंच तुमच्या मागून! ( तिघेही जातात.) कां चित्ररेखे कशी मौज उडाली? आतां असा घनघोर रण-संग्राम माजेल ह्मणतेस कीं ज्याचें नांव तें! पण आतां आधीं कैलास गांठला पाहिजे. हें पहा, चित्ररेखे जिकडे श्रीकृष्ण तिकडे मूर्तिमंत विजय आहेच ह्मणून समज. पण आधीं कैलास! आतां तूं आपली काय काय मौज होते ती गपचुप पहात रहा! अनिरुद्ध बंदींतून सुट-णार! त्याचें आणि तुझ्या सखीचें लग्न लागणार! आणि युद्धाचा शेवटही गोड होणार! पण आपली घटकाभर मौज! ह्मणून ह्मणतों, आधीं कैलास गांठूं या! इकडे कान कर. तुला मी दोन मंत्र देतों. पहिल्या मंत्राच्या योगानें तुला माझ्याबरोबर अदृश्य राहून एकंदर युद्ध चमत्कार पहातां येईल आणि दुसऱ्या मंत्राच्या योगानें पुनः वाटेल तेव्हां प्रगट होतां येईल. चल तर आतां जाऊं या कैलासाला! तिथे जाऊन शंकरतातमहाराजांकडे आतां अशी कळ लावावयाची बरें का,

**पद**—( किती वानुं बल. )

बलराम श्रीयदुवीर उभयही वीर बाणनगरीं ॥ येउनि त्यांनीं बाण-भक्त तो गांठियला समरीं ॥ ही वार्ता ॥ शिवताता ॥ बघ कळतां ॥ निज भक्ता ॥ रक्षावया तो धांवुनि वारिल संकट मदनारी ॥ १ ॥

( चित्ररेखा व नारद जातात. )

**प्रवेश ४ था समाप्त.**

---

## प्रवेश ५ वा.

**स्थळ**—( कारागृहापुढील मैदान. )

**अनि०**—( कारागृहांत )

**पद.**

दैवाची किति चित्र गती ही अतर्क्य या जगतीं ॥ अंत न लागे कोणासही ती कुंठित होय मती ॥ शूर वीर यदुवंशीं जन्मुनि ॥

पडलों सांप्रत मी या व्यसनीं ॥ पिता पितामह माझे भुवनीं ॥
ख्यात अजिंक्य सुवीर असोनी ॥ ही का माझि गती ॥ १ ॥

हाय हाय! मंदिरांतून मी एकाएकीं नाहींसा झालों त्या दिवसापासून या चार महिन्यांत माझ्या बाबांची, अजोबांची काय अवस्था झाली असेल? चहूंकडे ते माझा शोध करीत असतील. पणही माझी दुर्दशा त्यांना कशानें कळणार? प्रभो कैलासपते! आतां या संकटांतून मला आपल्यावांचून दुसरा कोण मुक्त करणार?

पद—( आवो आवो रंगेला )

धांवा पावा दयाळा ॥ भक्तपाळा हो ॥ तारा अनाथा भो विश्वनाथा ॥ स्वब्रीद पाळा हो ॥ देवाधिदेवा शरण पदीं ह्या ॥ ठेवुनि भाळा हो ॥१ ॥

( बाणासुर व वनचर येतात. )

**वनचर**—महाराज दूतानें सांगितलें तें कांहीं खोटें नाहीं! ते पाहिलेत यादव वीर! खवळलेल्या सिंहाप्रमाणें एकापेक्षां एक उग्र स्वरूपें धारण करून इकडे येत आहेत!

**अनिरुद्ध**—( स्वगत ) काय? आमचे यादववीर? तर मग परमेश्वरच पावला ह्मणायचा!

**वनचर**—महाराज, आतां मात्र कठीण प्रसंग दिसतो. हे वेशीचे दरवाजे तरी ध्या चटकन् लावून ह्मणजे ते शहरांत तरी घुसणार नाहींत! हे पहा आलेच.

आर्या

बल०—कोठें तो खल दुर्जन मत्त असुर बाण दाखवा आधीं ॥
बद्ध करुनि यदुपुरुषा ज्यानें जडवूनि घेतली आधी ॥
कृष्ण—कांपे काळहि थरथर ऐकुनि ज्यांच्या सुविक्रमा कानीं ॥
ते स्वस्थ केविं बसतिल खलकृतअपमान साहुनी मानी ॥
मदन—जाणोनि सर्पमाथां पद धरितां तो कसा न चावेल ॥
निद्रित हरिला जंबुक जागृत करितां कसा न कावेल ॥

**बाणा०**—हां, खबरदार पुढें पाऊल टाकाल तर ! ज्याला तुम्ही पहातां, तो हा तुमच्या पुढेंच उभा आहे.

**बल०**—आमच्या यदुपुरुषाला बंदींत टाकणारे ते तुह्मीच का ?

**बाणा०**—हो हो ! अपराध्याला योग्य शासन करणारा तो मीच !

**कृष्ण**—पण ज्याला तुम्ही बंदींत टाकलें आहे तो खरोखर अपराधी आहे अशाबद्दल तुमची पूर्ण खात्री आहे का ?

**बाणा०**—प्रत्यक्ष डोळ्यांनीं जी गोष्ट पाहिली तिच्याबद्दल आणखी जास्त खात्री काय असावयाची ?

**बल०**—पण अपराधाच्या मुळाशीं कोण होतें याची कांहीं चौकशी केलीत ?

**बाणा०**—केली किंवा नाहीं ती माझी मला माहीत ! त्याची तुह्माला पंचाईत ?

**बल०**—कृष्णा, हा दैत्य मोठा उन्मत्त दिसतो ! याची चांगली खोड मोडल्याशिवाय हा ताळ्यावर नाहीं यायचा !

**बाणा०**—काय, या बाणाची तुह्मी खोड मोडणार ? याचा पराक्रम अजून तुह्माला माहीत नाहीं असें दिसतें.

**बल०**—पण या हलधराशीं गांठ आहे समजलास ?

**बाणा०**—अरे जा ! नांगर मुसळ धरणारा तूं ! तुझ्या हातून काय व्हायचें आहे ? चल ये कर दोन हात असेल अंगात सामर्थ्य तर !

**बल०**—अरे तेवढ्याकरतांच तर आलों आहोंत. चल ये. ( दोघे लढतात. तोंच कार्त्तिकस्वामी—नारद—चित्ररेखा येतात. )

**कार्त्तिक०**—हां बाणा भिऊं नकोस ! कैलासाहून तातमहाराजांनीं मला तुझ्याच साह्याकरतां पाठवलें आहे.

**कृष्ण०**—कां नारदमुने ! इथेही आपण अहांतच का ?

**नारद्**—अरे, असलें हें युद्ध आमच्या सारख्यांनीं तरी केव्हां पहावें? हां बाणा चालूं दे! चित्ररेखे, आतां तूं आपली एक काम कर. नारद नारद ह्मण! या मंत्राचा जस जसा जप करशील तस तसा युद्धाला रंग चढेल पहा! (पुन्हा दोघांचें युद्ध होतें.)

**बल०**—हा वीर मोठा जबरदस्त दिसतो! भलत्यासलत्याला हा कसची दाद देणार?

**नारद्**—कां बलरामा दमलास वाटतें? बरें तर आतां क्षणभर तूं विसावा घे. कां कार्तिकस्वामी आपण इथे नुसती मौज पहायला आलांत वाटतें? मदना, अरे तोंडें काय पहात राहिला आहेस? या कार्तिकस्वामीशीं होऊं देत तुझे दोन हात.

**मदन**—हा पहा, मी तयार आहें. (दोघांचें युद्ध होतें. नंतर मदन स्त्रीअस्त्र सोडतो त्याबरोबर कांहीं स्त्रिया प्रगट होतात.)

**१ स्त्री**—(कार्तिकस्वामीस) महाराज, हा घ्यावा त्रयोदशगुणी तांबूल!

**कार्तिक०**—अरे हें काय लचांड? (दुसरीकडे पळतो.)

**२ स्त्री**—महाराज हा घ्यावा सुवासिक पुष्पगुच्छ! (तिसरीकडे पळतो.)

**३ स्त्री**—महाराज आपल्या अंगाला लावण्याकरितां ही सुगंधी उटी आणली आहे.

**कार्तिक०**—अरे, या स्त्रियांनीं तर माझी पाठच पुरवली! आतां इथून पळून जावें, यासारखें सुख नाहीं. (स्त्रियांस) हां खबरदार माझ्या मागून याल तर! आजपासून ज्या स्त्रिया माझें मुखावलोकन करतील, त्या सप्तजन्म विधवा होतील. (पळून जातो.)

**नारद्**—शाबास मदना! बहार उडवलीस! हां चित्ररेखे, ह्मण नारद नारद! नारद! नारद! बाणा, तुझ्या अंगीं सहस्रभुजांचें बळ आहे, पण या यादवांशीं प्रसंग आहे बरें का?

**बाणा०**—नारदमुने या वीराला आपण कमी समजलांत काय असेल हिंमत त्यानें यावें माझ्याशीं युद्ध करायला ! एकाला तर स्वस्थ बसवलेंच आहे.

**बल०**—काय ?

**कृष्ण**—दादा आपण जरा स्वस्थ असा. या मदोन्मत्ताचा मीच समाचार घेतों. दुष्टा, तुझें आयुष्य आज संपलें म्हणून समज !

**बाणा०**—अरे जा ! तुझ्या हातून माझें काय होणार ? काळयवनाला भिऊन पळणारा तोच कीं नाहीं तूं ? चल हो पुढें !

( दोघे युद्ध करतात. )

(स्वगत.) अरे पण हा काय चमत्कार ! या वीराशीं लढत असतां माझ्या सर्व शक्ति गलित झाल्यासारख्या कां बरें वाटतात ? ज्यावर आजपर्यंत मी शेंकडों रणधुरंधर वीर समरांगणांत हतवीर्य केले, तें माझें सहस्रभुजबल यावेळीं कुठे नाहींसें झालें ?

**कृष्ण०**—अरे विचार कसला चालवला आहेस ? अगोदर युद्ध कर आणि त्यांतून जगला वांचलास तर मग विचार कर !

**बाणा०**—अरे जगणें किंवा मरणें या कांहीं मनुष्याच्या स्वाधीनच्या गोष्टी नाहींत. ती एक ईश्वरी सत्ता आहे. पण माझ्या स्वाधीनची गोष्ट आहे ती आतां तुला दाखवतोंच. ही पहा प्रळयकाळच्या विजेप्रमाणें तेजस्वी अशी ही शिवशक्ति सोडतों तुझ्यावर !

**कृष्ण**—तर मग मीही आपलें सुदर्शन सोडतों आतां !

( इतक्यांत शंकरपार्वती येतात. )

**शंकर**—हां, हां, गोपालकृष्णा–

### पद

आवरीं सुदर्शनास यदुकुलावतंसा ॥ वधिसि केविं मत्प्रिय या भक्तराजहंसा ॥ प्रिय जैसा भक्त बळी तुजसि यादवेंद्रा ॥ बाण

दुजा प्राण तसा याहि भालचंद्रा ॥ निरसाया संतत निजभक्त-
दैन्यरंध्रां ॥ धरिला करिं हा त्रिशूल ब्रीद साक्ष ऐसा ॥

अहो हा बाण ह्मणजे माझा दुसरा प्राण. याच्यावर जर आपण सुदर्शन सोडलें तर याच्या संरक्षणार्थ मला पाशुपतास्त्र सोडावें लागेल आणि मग हीं दोन्ही अस्त्रें ब्रह्मांडांत केवढा प्रलय करून सोडतील त्याची कल्पना तरी कुणाला होईल का? तर यःकश्चित् गोष्टीकरतां एवढा प्रळय माजविण्यांत काय अर्थ? याकरितां माझी विनंति ऐका आणि या माझ्या भक्ताला आपण सर्व अपराधांची क्षमा करून पदरांत घ्या. बाणा, भगवान् श्रीकृष्णाच्या चरणावर आधीं मस्तक ठेव पाहूं. अरे हे गोपालकृष्ण ह्मणजे साक्षात् श्रीविष्णुचे अवतार! हे आणि मी कांहीं दोन नाहीं. तुझ्या इच्छेप्रमाणें श्रीकृष्णासारखा वीर तुला झुंजायला देऊन मी आपला वर पूर्ण केला. जसा माझा वर तुला तसाच अपर्णेचा तुझ्या कन्येला होता; त्याप्रमाणें तिला अनिरुद्ध पति मिळून ज्या कांहीं गोष्टी घडून आल्या आहेत, त्यांचा शेवट आतां गोड होऊं दे!

**बाणा०**—हे परब्रह्म स्वरूपा गोपालकृष्णा! हा दासानुदास आपल्याला शरण येत आहे, तर याच्या सर्व अपराधांची याला क्षमा करा!

**कृष्ण**—बाणा! उठ तुला पूर्ण क्षमा आहे! अरे कैलासनाथांचा जो भक्त तो माझाही भक्तच.

**नारद**—हें तर खरेंच! पण याशिवाय आणखी एक याचा आणि आपला अगदीं निकट संबंध आहे! आपला प्रिय भक्त जो बळी त्याचाच पुत्र हा बाण! ह्मणून हा आपल्याला विशेष प्रिय असला पाहिजे.

**शंकर**—अरे तूं कळीचा नारद आहेसच का इथे?

**नारद**—अहो माझ्या कळीनेंच तर एवढी बहार उडवली! आपले उभयतांचे वर आणि माझी कळ या तिहींची चांगली सांगड बांधली गेली ह्मणून तर ही घटकाभर मौजच्या मौज होऊन सर्व

गोष्टींचा शेवटही गोड झाला. इतक्या सर्व गोष्टी जमवून आणायला मला किती तरी कारस्थानें लढवावीं लागलीं ! प्रथम चित्ररेखेचा द्वारकेंत प्रवेश मीच करून दिला. अनिरुद्धाला मंचकासह उचलून नेण्याची युक्ति तिला मीच सांगितली. आणि मग सुटलों चहूंकडे कळी लावीत नी काय ! अहो त्रिभुवनांत आमची कळीचे नारद ह्मणून ख्याति !–आणि ती ह्मणजे खोटी आहे असें नाहीं–पण हें आमचें कसब आपलें आमचें आह्मला साधून गेलें आहे. आमचा कित्ता दुसरा एखादा गिरवील ह्मणेल तर तो जागजागीं तोंडघशीं पडेल ! पण बाणा, आतां जांवयाला कां ठेवला आहेस उगीच बंदींत ?

**बाणा०**—हो, जा, वनचरा त्यांना मुक्त करून घेऊन ये इकडे. ( वनचर अनिरुद्धाला बंदींतून सोडवून आणतो व अनिरुद्ध सर्वांना भेटतो. )

**बाणा०**—( अनिरुद्धास ) मी तुझ्यासारख्या वीराला अविचारानें बंदिवासाचें दुःख दिलें, याबद्दल मला फार वाईट वाटतें.

**शंकर**—अपर्णेनें तुझ्या कन्येला हा योग्य असाच वर दिला आहे.

**बाणा०**—महाराज, आपणां सर्वांसमक्ष मी माझ्या मुलीचा हात याच्या हातांत देणार ! वनचरा जा उषेला घेऊन ये. ( वनचर जातो. )

**नारद**—कां चित्ररेखे, कुणाच्याही दृष्टीस न पडतां तुला मिळाली कीं नाहीं मौज पहायला ?

**चित्र०**—पण आतां मी प्रगट केव्हां होऊं ?

**नारद**—मी सांगेन तेव्हां–पण चित्ररेखे––

साकी

उभयिं मिळोनी आपण धरिलें सुकार्य हातीं जें हें ॥ किति मौजेनें तरी आज तें सिद्धिस गेलें पाहें ॥ परहित साधाया झटती ॥ त्यांस। ईश साह्य जगतीं ॥ १ ॥

( वनचर व उषा येतात. )

बाणा०—( अनिरुद्धाच्या हातांत उषेचा हात देऊन )

पद

देव ब्राह्मणां समक्ष तव करीं अतां ॥ अर्पितों स्वकन्यका हि घे मदनसुता ॥
नारद व कृष्ण .—धर्मनीतिप्रीतिरीतियुक्त उभयतां ॥ राहुनी कराच सुगम लोकमान्यता ॥ १ ॥
शंकर.—भक्तिसुधारस सेवुनियां ॥ नरजन्म सुसार्थकिं लावुनियां ॥ मग अंतिं मत्पदास या ॥ अक्षय शांति घ्यावया ॥

पार्वती—कां उषे, माझ्या वराप्रमाणं तुझे सर्व मनोरथ पूर्ण झालेना?

उषा—मातोश्री, सर्व कांहीं झालं. पण प्रसंगीं साह्य करणारी माझी खी चित्ररेखा कुठे दिसत नाहीं ?

नारद—अग, ही पहा तुझी चित्ररेखा इथेच आहे. चित्ररेखे, तां प्रगट होऊन भेट आपल्या सखीला.

चित्र०—( प्रगट होऊन ) गडे उषे !

उषा—कोण चित्ररेखा ! अग तूं होतीस तरी कुठें ? ( दोघी कमेकींना भेटतात. )

बाणा०—खरेंच नाहींशी झालेली चित्ररेखा इतक्यांत इथे कुणी हून आली ?

नारद—या उभयतांच्या भेटीचा योग जुळवून आणायाला कारण ! तेव्हां आपल्या क्रोधाग्नीला कदाचित् तूं हिला बळी देशील म्हणून च हिला आपल्याबरोबर गुप्तरूपानें बाळगिली होती !

शंकर—असो, झालें तें सर्व ठीक झालें. बाणा, माझ्या वराप्रमाणें ा हेतु पूर्ण झाला आणि अपर्णेच्या वराप्रमाणें तुझ्या मुलीचा हेतु ण झाला ! तसेंच परोपकारार्थ नारदानें आणि चित्ररेखेनें ज्या मा- ं अवलंबन केलें, त्याच मार्गाचें व्यवहारांत प्रसंगोपात अवलंबन रणें हेंच योग्य. असो, बाणा आतां आणखी तुझी काय इच्छा आहे ?

बाणा०—महाराज आतां अखेरची इच्छा एवढीच आहे—

### पद

### भारतवाक्य.

सदाचार सद्धर्म नीतिनयपथं अनुसरणारे ॥ निर्लोभत्वें स्वदेशसेवा अखंड करणारे ॥ गोब्राह्मणसंरक्षण हेंची ब्रीद पाळणारे ॥ कायावाचा मनोभक्तिनें परार्थ झटणारे ॥ स्वातंत्र्याची पूर्णपणें ती महति जाणणारे ॥ निपजावे जन ऐसे भूवरि सत्वमूर्ति सारे ॥ १ ॥

### कोरस.

सर्व.—श्रीरामा सुखधामा सुविरामा वरनामा आत्मारामा ॥ सुविहितकामा ॥ पुरवुनि आह्मां ॥ सकलां दे सद्विश्रामा ॥ भो दशरथनंदन ॥ दशशिरमर्दन ॥ सतत संतजन तव पदवंदन ॥ करुनि निरंजन ॥ रूपीं घेती आरामा ॥ भो प्रणतशुभंकर ॥ अखंड शंकर ॥ हृदानंदकर ॥ पदाब्जमधुकर ॥ असो निरंतर ॥ किंकर दामोदर नामा ॥ १ ॥

श्रीमत्सद्गुरुपदार्पणमस्तु.

समाप्त.